पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध

RNINO.MAHMAR/2013/57952

रविवार, दि. २१ जून २०२६ | वर्ष : १४ | अंक : ५८ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

४ गटकळ शाळेत योग दिवस उत्साहात साजरा

५ पोलीस ठाण्यात धिंगाणा घालणाऱ्यावर गुन्हा


पान ८ वर



# वैद्यकीय पदवी प्रवेशासाठीची फेरपरीक्षा आज; पेपरफुटी रोखण्यासाठी सुरक्षेत वाढ

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणातर्फे वैद्यकीय पदवी प्रवेशासाठीची (नीट–यूजी) फेरपरीक्षा उद्या (२१ जून) देशभरात आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेदरम्यान पेपरफुटी रोखण्यासाठी सुरक्षेत मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक परीक्षा केंद्रांवर 'भिंतीवरील घड्याळ' अनिवार्य करण्यात आले आहे. 'एनटीए'तर्फे मे महिन्यात घेण्यात आलेल्या नीट–यूजी परीक्षेत पेपरफुटी झाल्याचा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला. या प्रकरणी चौकशी करत सीबीआयने अनेकांना ताब्यात घेतले आहे.



मात्र, पेपरफुटीमुळे पुन्हा अभ्यास करून फेर परीक्षा देण्याची वेळ देशभरातील लाखो विद्यार्थ्यांवर आली आहे. रविवारी होणाऱ्या परीक्षेसाठीच्या प्रश्नपत्रिका वायूदलाने परीक्षा केंद्रावर पोहोचवल्या आहेत. तसेच अन्य अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. देशभरातील २२ लाख ७९ हजार उमेदवार परीक्षा देणार आहेत.

फेरपरीक्षा वेळ दुपारी २ ते ५.१५ या वेळेत होणार आहे. उमेदवारांना १५ मिनिटे वाढवून देण्यात आला आहे. तर दिव्यांग उमेदवारांना ६:२० वाजेपर्यंतची वेळ दिली जाणार आहे. परीक्षेसाठी उमेदवारांना सकाळी ११ ते दुपारी १.२० या वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचणे आवश्यक आहे. दुपारी १.३० नंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेश दिला जाणार नाही. बायोमेट्रिक पडताळणीत तांत्रिक अडचण आल्यास लेखी हमीपत्र घेऊन प्रवेश देण्याची मुभा कायम ठेवण्यात आली आहे. फेरपरीक्षा देशभरातील ५५१ शहरांमध्ये घेतली जाणार आहे. निष्पक्ष देखरेखीसाठी ६६६९ स्वतंत्र निरीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. मे महिन्यातील परीक्षेवेळी ६ हजार निरीक्षक नियुक्त करण्यात आले होते.

फेरपरीक्षेबाबत एनटीएने प्रसिद्ध केल्या प्रसिद्धिपत्रकावर राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे (एनएमसी) बोधचिन्ह आणि नावाचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे फेरपरीक्षेवर वैद्यकीय आयोगाची थेट देखरेख असल्याचे अधोरेखित होते.

### परीक्षा केंद्रांवर 'भिंतीवरील घड्याळ' अनिवार्य

उमेदवारांना वेळेचे नियोजन नीट करता येण्यासाठी फेरपरीक्षेच्या नियमावलीत एक नवीन सुविधा समाविष्ट करण्यात आली आहे. आता प्रत्येक परीक्षा कक्षात भिंतीवरील घड्याळ उपलब्ध करून दिले जाणार आहे.

### तक्रारींसाठी नवीन संकेतस्थळ

फेरपरीक्षेदरम्यान उमेदवारांना किंवा नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या शंका अथवा गैरप्रकारांबाबत तक्रार नोंदवण्यासाठी एनटीएने नव्या संकेतस्थळाची निर्मिती केली आहे.

पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेतील हेर प्रकरण

# डॉ. प्रदीप कुरुलकरविरुद्ध आरोप निश्चित; खटल्याची सुनावणी जुलै महिन्यात

पुणे : पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेला गोपनीय माहिती पुरविल्याप्रकरणी संरक्षण संशोधन विकास संस्थेचा (डीआरडीओ) माजी संचालक डॉ. प्रदीप कुरुलकर याच्याविरुद्ध आरोप निश्चित करण्यात आले. या खटल्याची सुनावणी जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होणार आहे.

कुरुलकरविरुद्ध शासकीय गुपिते अधिनियमान्वये (ऑफिशिएल सिक्रसी क्ट) आरोप निश्चित करण्यात आले. पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेतील हेराला संरक्षण सिद्धतेची गोपनीय माहिती पुरविल्याच्या आरोपावरून राज्य दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) कुरुलकरला ४ मे २०२३ रोजी अटक केली. या प्रकरणात 'एटीएस'ने कुरुलकरविरुद्ध दोन हजार पानी आरोपपत्र दाखल केले.

शासकीय गुपिते अधिनियमातील तरतुदींची पूर्तता न केल्याने हे प्रकरण विशेष न्यायदंडाधिकारी न्यायालयाकडे वर्ग करण्यात आले होते. 'एटीएस'ने तांत्रिक बाबींची पूर्तता केल्यानतंर या खटल्याचे कामकाज विशेष सत्र न्यायालयाकडे सोपविण्यात आले. या खटल्याचे कामकाज पी. वाय. लाडेकर यांच्या न्यायालयाकडे सोपविण्यात आले आहे. त्यानंतर गुरुवारी (१८ जून) कुरुलकरविरुद्ध आरोप निश्चितीची प्रक्रिया पूर्ण झाली.

या खटल्यात विशेष सरकारी वकील उज्ज्वला पवार काम पाहत आहेत. कुरुलकरच्या वतीने ड. ऋषीकेश गानू यांनी दोषमुक्तीचा अर्ज न्यायालयात सादर केला होता. न्यायालयाने दोषमुक्तीचा अर्ज फेटाळून लावला आहे. बचाव पक्षाकडून ड. ऋषीकेश गानू राधव पुराणिक काम पाहत आहेत. गोपनीय माहिती पाकिस्तानला पुरविल्याप्रकरणी डॉ. प्रदीप कुरुलकरविरुद्ध शासकीय गुपिते अधिनियमान्वये आरोप निश्चित करण्यात आले आहेत. जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात या खटल्याच्या सुनावणीस सुरुवात होईल. – उज्ज्वला पवार, विशेष सरकारी वकील

## संक्षिप्त



### चायनीज गाडा लावण्याच्या वादातून बेदम मारहाण आणि बीअरच्या बाटलीने हल्ला

पुणे (जनप्रवास) : चायनीज गाडा लावण्याच्या वादातून एका व्यावसायिकाला, त्याच्या भावाला आणि मित्राला लाकडी दांडके, बीअरच्या बाटल्या आणि दगडाने बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले. ही घटना बुधवारी (१७ जून) रात्री ११ वाजण्याच्या सुमारास विकी वाईन समोर, चिंचवड स्टेशन चौक, चिंचवड येथे घडली. या प्रकरणात लक्ष्मण केसबलाल बुडा (१९, गंगानगर आकुर्डी) यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार राहुल खेमचंद दासाणी (२८, निगडी प्राधीकरण), सौरभ संतोष सिंग (२८, पिंपरी कॉलनी, पिंपरी) आणि सुमित रमेश थोरात (२३, यशवंतनगर, तळेगाव दाभाडे) यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे आपला चायनीज गाडा बंद करून आवरत असताना आरोपीने दुकानासमोरील गाडा हटवण्यास सांगून शिवीगाळ व हाताने मारहाण केली. त्यानंतर आरोपी सौरभ आणि सुमित यांनी बीअरची बाटली फिर्यादीच्या डोक्यात फोडून वार केले, तर राहुल याने लाकडी दांडक्याने पाठीवर व डोक्यात मारहाण केली. फिर्यादीचा भाऊ दीपक यालाही आरोपींनी बीअरची बाटली आणि दगडाने मारून जखमी केले, तसेच मित्रालाही दगडाने मारून दुखापत केली. पिंपरी पोलीस तपास करीत आहेत.

### भरधाव ट्रकच्या धडकेत १० वर्षीय बालिकेचा मृत्यू

पुणे (जनप्रवास) : एक भरधाव ट्रकने स्कुटीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात १० वर्षांच्या चिमुरडीचा मृत्यू झाला असून स्कुटी चालक महिला गंभीर जखमी झाली आहे. ही घटना बुधवारी (१७ जून) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास भांबोली गावच्या हद्दीत संततुकाराम सर्कल भांबोली येथे घडली. सृष्टी रोहित कुमार रावत (१०) असे मृत्यू झालेल्या मुलीचे नाव आहे. या प्रकरणी महिलेने उत्तर महाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार ट्रक चालक याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'एमडी' ड्रग्जची विक्री करणाऱ्या फूड डिलिव्हरी बॉयला वाकडमध्ये अटकेत

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : ऑनलाईन फूड डिलिव्हरीचे काम करणाऱ्या एका तरुणाला वाकड परिसरात दीड लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीचे एमडी (मॅफेड्रॉन) पावडर विकताना पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई गुरुवारी (१८ जून) रात्री ८.४५ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. या प्रकरणी वाकड पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस फौजदार संदीप गवारी यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार निसार अकबर मुजावर (२६, गुजर नगर, थेरगाव, मूळ– तुळजापूर, धाराशिव) या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी निसार मुजावर हा फूड डिलिव्हरी बॉय म्हणून काम करतो. तो मोकळ्या मैदानामध्ये ३८ हजार रुपये किमतीचे ७.६० ग्रॅम वजनाचे पांढरट रंगाचे एमडी (मॅफेड्रॉन) पावडर विकण्यासाठी घेऊन आला होता. पोलिसांनी सापळा रचून त्याला पकडले आणि त्याच्याकडून अंमली पदार्थांसह प्लॅस्टिक पिशव्या, एक मोबाईल आणि मोपेड दुचाकी असा एकूण १ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पाच ते सहा महिन्यांपासून आरोपी ड्रग्जची विक्री करीत होता. वाकड पोलीस तपास करीत आहेत.



# पोर्शे अपघात प्रकरणात विशाल अगरवालचा जामीन रद्दसाठी पुणे पोलिसांची कोर्टात धाव


जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : 'कल्याणीनगर अपघात प्रकरणात बांधकाम व्यावासयिक विशाल अगरवाल याच जामीन रद्द करण्यासाठी पोलिसांकडून न्यायालयात अर्ज केला जाणार आहे. पुणे पोलिसांकडून २३ जून रोजी याबाबत सत्र न्यायालायात अर्ज दाखल केला जाणार आहे', अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाकडून अगरवाल याला जामीन मंजूर करण्यात आला. त्यानंतर समाज माध्यमात अगरवाल आणि कुटुंबीय जल्लोष करतानाची कथित चित्रफीत समाज माध्यमात प्रसारित झाली. 'पुणे पोलिसांनी या घटनेची दखल घेऊन अगरवाल याचा जामीन रद्द करण्यात यावा, यासाठी तयारी सुरू केली आहे. २३ जून रोजी न्यायालयात याचिका दाखल केली जाणार आहे. त्यासाठी राज्याच्या विधी आणि न्याय विभागाची परवानगी मिळवण्यात आली आहे', असे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी पत्रकारांशी बोलताना नमूद केले. कल्याणीनगर भागात भरधाव मोटारीने दुचाकीस्वार संगणक अभियंता तरुण–तरुणीला धडक दिली होती. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात अगरवाल याच्या अल्पवयीन मुलासह मित्रांना ताब्यात घेण्यात आले होते. त्यांच्या रक्ताचे नमुने बदलण्यासाठी अगरवाल आणि साथीदारांनी ससूनमधील डॉक्टरांशी संगनमत केले होते. ही बाब तपासात उघडकीस आल्यानंतर विशाल अगरवाल याला अटक करण्यात आली होती. त्याचा जामीन फेटाळण्यात आला होता. त्यानंतर अगरवालने सर्वोच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता.

सर्वोच्च न्यायालायने कठोर अटी, शर्तींवर अगरवालचा जामीन मंजूर केला होता. जामीन मिळाल्यानंतर अगरवाल याची कुटुंबीयांसोबत जल्लोष करताना कथित चित्रफीत प्रसारित झाली होती. समाज माध्यमात ही चित्रफीत प्रसारित झाल्यानंतर पोलिसांनी दोघांचे जबाब नोंदवून घेतले होते. जबाब आणि डिजिटल पुरावे न्यायालयात सादर केले जाणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाने अगरवाल याला घालून दिलेल्या अटींचा भंग झाल्याची माहिती न्यायालयात दिली जाणार आहे.

विशाल अगरवाल याने संबंधित चित्रफीत २०२३ मधील असल्याचा दावा केला होता. जामीन मिलाल्यानंतर जल्लोष केला नाही, असे अगरवाल याने सांगितले होते. मात्र, पोलिसंनी ही बाब गांभीर्याने घेतली आहे.



# नसरापूर अत्याचार प्रकरण : भीमराव कांबळे याची गुन्ह्याची कबुली

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : नसरापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे याने विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयासमोर शुक्रवारी जबाब नोंदविला. नसरापूर अत्याचार प्रकरणाचा खटल्याची सुनावणी अंतिम टप्प्यात आली आहे. या प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे याचा जबाब शुक्रवारी विशेष न्यायालयात नोंदविण्यात आला. बंदोबस्तात कांबळे याला न्यायालयाने पोलिसांसमोर हजर केले. वरिष्ठ पोलीस अधिकारी राजेंद्र मायने, तपास अधिकारी पोलीस निरीक्षक विजयमाला पवार, बचाव पक्षाचे वकील हिंमतराव सूर्यवंशी या वेळी उपस्थित होते.

विशेष सरकारी वकील अजय मिसर, सहायक वकील सुरेश गायकवाड, ड. प्रथमेश हिंगणे हे व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे उपस्थित होते. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ३५१ अन्वये कांबळे याचा जबाब न्यायालयासमोर नोंदविण्यात आला.

सकाळी अकराच्या सुमारास जबाब नोदविण्यास सुरुवात झाली. न्यायालयाने सोप्या भाषेत ५५ साक्षीदारांचे पुरावे आरोपीला समजावून सांगितले. आरोपीला न्यायालयाने ८८ प्रश्न विचारले. सुरुवातीला आरोपी कांबळे याने सीसीटीव्ही चित्रीकरणात आपण नसल्याचे न्यायालयाला सांगितले. त्यानंतर न्यायालयाने सीसीटीव्ही चित्रीकरण आरोपीला 'झूम' करून दाखविले. त्यानंतर चित्रीकरणात दिसणारी व्यक्ती मीच असल्याची कबुली कांबळे याने न्यायालयात दिली.

आरोपी भीमराव कांबळे याने शुक्रवारी न्यायालायासमोर जबाब नोंदविला. त्यानंतर विशेष सरकारी वकील अजय मिसर, सुरेश गायकवाड, प्रथमेश हिंगणे, बचाव पक्षाचे वकील हिंमतराव सूर्यवंशी हे शनिवारपासून (२०) अंतिम युक्तिवादास सुरुवात करणार आहेत. नसरापूर अत्याचार प्रकरणाचे संतप्त पडसाद राज्यभर उमटले. जलदगतीने तपास करुन पोलिसंनी गुन्हा घडल्यानंतर १४ दिवसांत आरोपीविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. पोलिसांनी भक्कम पुरावे आरोपीविरुद्ध सादर केले. त्यानंतर पोलिसांनी ५५ साक्षीदारांची साक्ष सरकार पक्षाने नोंदविली.

# पोस्को प्रकरणातील चार आरोपींना जामीन मंजूर

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : विश्रांतवाडी पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आलेल्या पोस्को कायद्यांतर्गत गुन्ह्यातील चार आरोपींना मा. विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. वाय. थत्ते साहेब यांनी जामीन मंजूर केला आहे. सदर प्रकरणात फिर्यादी यांनी तिची आई, मावशी तसेच त्यांच्या दोन सहकाऱ्यांविरुद्ध लैंगिक छळ, अश्लील कृत्ये, जबरदस्तीने विवाह लावून देण्याचा प्रयत्न आदी आरोपांवरून विश्रांतवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी संबंधित चारही आरोपींना अटक करून न्यायालयासमोर हजर केले होते. त्यानंतर न्यायालयाने आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावली होती.



त्यानंतर आरोपींच्या वतीने ड. राकेश सोनार (–वीं. ठरज्ञशीह डेपरी) यांनी मा. विशेष जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. जामीन अर्जाच्या सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने अर्जास विरोध दर्शविला. मात्र, ड. राकेश सोनार यांनी आरोपींची बाजू प्रभावीपणे मांडताना न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, सदर प्रकरण हे कौटुंबिक वादातून उद्भवलेले असून कथित घटना घडल्याची तारीख व गुन्हा दाखल झाल्याची तारीख यामध्ये लक्षणीय तफावत आहे. तसेच प्रथमदर्शनी उपलब्ध नोंदींवरून आरोपींविरुद्ध खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा संशय निर्माण होतो.

याशिवाय फिर्यादी व तिच्या वडिलांचा सदर गुन्हा दाखल करण्यामागील हेतू वेगळा असून पोस्को कायद्याचा गैरवापर करण्यात आल्याचे मुद्देही न्यायालयासमोर मांडण्यात आले.

# पुणे महापालिकेत ७ अब्ज रुपयांचा कचरा घोटाळा?

## काँग्रेसची थेट 'सीसीआय'कडे धाव

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत काढण्यात आलेल्या ५०० मेट्रिक टन प्रतिदिन कचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या निविदेमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता दिसून आली असून, यात तब्बल ७ अब्ज रुपयांचा मोठा घोटाळा असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नगरसेवक अरविंद शिंदे यांनी केला आहे.

या संदर्भात त्यांनी थेट कॉम्पिटिशन कमिशन ऑफ इंडिया , नवी दिल्ली येथे पुणे महापालिकेविरोधात अधिकृत तक्रार दाखल केली आहे.या निविदेतील अटी–शर्ती अशा प्रकारे तयार करण्यात आल्या आहेत, ज्यातून ठराविक ठेकेदारालाच लाभ मिळेल आणि पुणेकरांच्या पैशांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.




१५ जून २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदा क्र. ०३/२०२६–२७ मध्ये ३०० मे. टन ओला आणि २०० मे. टन सुका कचरा एकत्रित प्रक्रिया करण्याचा प्रस्ताव आहे. मात्र, विद्यमान नियम, घनकचरा व्यवस्थापन अधिनियम, तसेच केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार ओला व सुका कचरा वेगवेगळ्या प्रकल्पांद्वारे प्रक्रिया करण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. तरीही एकत्रित प्रकल्पाचा आग्रह धरण्यात आल्याने स्पर्धा मर्यादित होऊन फक्त एक–दोन ठेकेदारच पात्र ठरतील, अशी रचना जाणीवपूर्वक करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत केला आहे.

तब्बल ७ अब्ज रुपयांच्या या महाकाय निविदेत जॉईंट व्हेंचर , सहकारी संस्था आणि स्वयंसेवी संस्थांना सहभागी होण्यास बंदी घालण्यात आली आहे. यामुळे निविदा प्रक्रियेतील पारदर्शक स्पर्धा रोखली जात आहे. शहरात आधीच सुमारे २५०० टन सुक्या कचऱ्याच्या प्रक्रियेची क्षमता उपलब्ध असताना, नवीन प्रकल्पाची गरजच काय? असा सवालही अरविंद शिंदे यांनी उपस्थित केला आहे.

या निविदेबाबत महापालिकेच्या दक्षता विभागाने १८ मे रोजी तब्बल १४ गंभीर आक्षेप नोंदवले होते. तसेच अतिरिक्त आयुक्तांनीही स्वतंत्र पत्राद्वारे यावर त्रुटी बोट ठेवून आक्षेप घेतले होते. मात्र, हे सर्व आक्षेप अवघ्या काही तासांत फेटाळून लावत अतिरिक्त आयुक्तांकडून निविदा प्रक्रिया घाईघाईने पुढे रेटली जात असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशयाची सुई निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे, याआधीही हा सुमारे ७ अब्ज रुपयांचा ठेका 'भूमी ग्रीन' या कंपनीस विनानिविदा देण्याचा प्रयत्न झाल्याचे समोर आले होते. या संदर्भात २० मार्च, ९ एप्रिल आणि १२ मे २०२६ रोजी आयुक्तांकडे लेखी तक्रारी करण्यात आल्या होत्या. दरम्यान, १७ जून २०२६ रोजी झालेल्या बैठकीतनगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनीही या निविदेबाबत तीव्र आक्षेप घेत, ओला व सुका कचरा प्रक्रिया वेगवेगळ्या निविदांद्वारे करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. ठराविक ठेकेदाराचे उखळ पांढरे करण्यासाठी अधिकाऱ्यांनी संगनमताने या अटी लादल्या असून यात मोठा भ्रष्टाचार झाला आहे. ही संपूर्ण निविदा प्रक्रिया तातडीने रद्द करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. पुणेकरांच्या पैशांची होणारी ही लूट सहन करणार नाही, म्हणूनच आम्ही 'सीसीआय'कडे दाद मागितली आहे.

# अक्षरधारा

# हिंदुहृदयसम्राटांचे 'विखुरले स्वप्न'

**"राज्यात सर्वाधिक प्रखर हिंदुत्ववादी आणि सत्तेपेक्षा बेधडक व आक्रमक असलेल्या शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरेंचे कुणाच्याही समोर न झुकणारे नेतृत्व होते. पण आज सत्तेच्या निमित्ताने शिवसेना दोन गटात, दोन नेतृत्वात शिवसेना विखुरली गेली. एकसंध असताना संपूर्ण प्रभाव आणि सत्तेची सूत्रे असणारी शिवसेना आणि बाळासाहेबांचे एकेकाळचे खंदे शिलेदार आज वेगवेगळ्या गटांत, वेगवेगळ्या पक्षांत स्थिरावले आहेत आणि त्यांच्या सोबतच बाळासाहेबांचे स्वप्नदेखील वेगवेगळ्या गटांत विखुरले गेले आहे. शिवसेना या पक्षावर नेमकी मालकी कुणाची हा प्रश्न सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. पुढे कधीतरी त्या प्रश्नाचा निकाल लागेल. एकनाथ शिंदे किंवा उध्दव ठाकरे यापैकी कुण्या एकाच्या बाजूने हा निकाल असेल. पण हिंदुत्व असो वा सत्ता आम्ही म्हणेल ती पूर्वदिशा न राहता दुसऱ्याच्या इशाऱ्यावर पोहोचली आहे हे मात्र खरे.**



'एक ध्वज, एक नेता, एक विचार' असा एकत्वाचा नारा देणाऱ्या शिवसेनेचे गेल्या चार वर्षांपासून दोन भाग झाले आहेत. गेल्या चार वर्षांपासून शिवसेनेचे एकाच दिवशी दोन स्वतंत्र मेळावे, दोन स्वतंत्र सभा दोन वेगळ्या नेत्यांच्या मार्गदर्शनात झाल्या. साम्य केवळ एकच, हे दोन्ही नेते आपला ध्वज आणि विचार एकच असल्याचा दावा करीत आहेत. सत्तेत होते तोपर्यंत मूळच्या हिंदुत्ववादी भूमिकेला थोडे कोपऱ्यात ढकलणाऱ्या उध्दव ठाकरेंनी सत्ता जाताच आपणच खरे हिंदुत्ववादी अशी भूमिका घेतली. बाळासाहेब ठाकरेंनी स्थापन केलेल्या शिवसेनेचे आपणच खरे वारसदार, बाळासाहेबांचा पुत्र म्हणून शिवसेनेवर आपलाच खरा अधिकार, असा दावा उध्दव ठाकरे करत असतात.

अर्थात महाविकास आघाडी म्हणून निवडणूक लढवण्याची वेळ येते तेव्हा त्यांचे कडवे हिंदुत्व हलकेच सर्वसमावेशक वगैरे होते. दुसरीकडे मूळ शिवसेनेने हिंदुत्ववादी विचारांशी फारकत घेतल्यामुळे स्वतंत्र पक्ष स्थापन करावा लागल्याचा तर्क देणाऱ्या आणि मूळ शिवसेनेच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या एकनाथ शिंदेंचा मूळ शिवसेनेचे आपणच खरे वारसदार असल्याचा दावा, त्यामुळे एकाच दिवशी दोन मेळावे, दोन हुंकार, दोन गर्जना वगैरे पहायला मिळत आहेत. एवढेच नव्हे तर एकसंध शिवसेनेची ताकद महाराष्ट्रात भाजपपेक्षा मोठी होती. भाजप भले राष्ट्रीय पक्ष असला तरी त्याची वाटचाल आणि वाढ शिवसेनेच्या अंगा-खांद्यावर आणि त्यांच्याच बळावर झाली हे उघड आहे.

अर्थात बाळासाहेब ठाकरेंनी स्थापन केलेल्या शिवसेनेचा हीरक महोत्सव साजरा होत असताना या दुभंगलेल्या दुर्दैवाविषयी मराठी माणसाला नक्कीच वेदना होत असणार; परंतु राजकारण म्हटले, की हे सगळे प्रकार होणे अपेक्षितच असतात. वैचारिक वारसा, विचाराशी बांधिलकी, नेत्यावरची श्रद्धा, त्याच्याशी इमान या सगळ्या गोष्टी सत्ता सुंदरी समोर अनेकदा निरर्थक ठरतात. शिवसेनेत पहिली मोठी फूट पडली ती छगन भुजबळ यांच्या रूपाने. विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद पक्षाने मनोहर जोशी यांच्याकडे दिल्यामुळे भुजबळ नाराज झाले आणि त्यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला. नंतरच्या काळात मुंबईच्या बाबतीत सगळे अधिकार आपल्याला हवे हा राज ठाकरेंचा आग्रह बाळासाहेबांनी मान्य केला नाही आणि त्यांना नाशिक वगैरे प्रांताची जबाबदारी दिली. तेव्हापासून राज ठाकरे नाराज होते. पुढे पक्षातील उध्दव ठाकरेंचे वाढते वर्चस्व त्यांना सहन झाले नाही किंवा त्यांचा पक्षात जाणीवपूर्वक कोंडमारा करण्यात आला म्हणून म्हणा राज ठाकरे पक्षाबाहेर पडले.



राजरंग

**अमृत चौगुले**

राज ठाकरे प्रमाणेच नारायण राणे यांनादेखील पक्षात सापत्न वागणूक मिळू लागली, नारायण राणे भविष्यात मुख्यमंत्री पदासाठी एक मोठे स्पर्धक ठरू शकतात ही भीती कदाचित त्यामागे असावी. नारायण राणे देखील याच कारणामुळे पक्षातून बाहेर पडले. डावलले जात असल्याची भावना आणि पक्ष नेतृत्व करीत असलेले चौकडीचे राजकारण एकनाथ शिंदे यांना बंड करण्यास प्रवृत्त करून गेले. थोडक्यात सत्ता, अधिकारपद या गोष्टी विचार, वारसा आणि निष्ठा यावर नेहमीच वरचढ ठरत आल्या आहेत. ठाकरे बंधू, राणे, भुजबळ, शिंदे या सगळ्यांनी एकत्र येऊन पुन्हा पूर्वीची वैभवशाली शिवसेना उभी करावी ही सर्वसामान्य मराठी माणसांची, बाळासाहेबांच्या चाहत्यांची कितीही इच्छा असली तरी ते केवळ एक स्वप्न आहे.

बाळासाहेबांचे एकेकाळचे खंदे शिलेदार आज वेगवेगळ्या गटांत, वेगवेगळ्या पक्षांत स्थिरावले आहेत आणि त्यांच्या सोबतच बाळासाहेबांचे स्वप्नंदेखील वेगवेगळ्या गटांत विखुरले गेले आहेत. शिवसेना या पक्षावर नेमकी मालकी कुणाची हा प्रश्न सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. पुढे कधीतरी त्या प्रश्नाचा निकाल लागेल. एकनाथ शिंदे किंवा उध्दव ठाकरे यापैकी कुण्या एकाच्या बाजूने हा निकाल असेल; परंतु एका विशाल साम्राज्याच्या ठिकऱ्या उडाल्या आहेत. एवढेच नव्हे एकेकाळी सम्राटासारखे वावरणारे नेते उध्दव ठाकरे काँग्रेसचे, तर सत्तेत दुसऱ्या क्रमांकावर असलेले एकनाथ शिंदे हे दोघे भाजपचे मांडलिक झाले आहेत, ही वस्तुस्थिती बदलणारी नाही. एवढेच नव्हे तर बाळासाहेबांच्या सडेतोड विचारांशी सत्तेसाठी तडजोड आणि दिल्ली दरबारी मुजरा बाळासाहेबांच्या विचारांशी प्रतारणाच म्हणावी लागेल.

---

# जमाना डिजिटल प्लॅटफॉर्मचा

**"अनेकांना अनेकांच्यापर्यंत पोहचण्याचे वेगवेगळे मार्ग माणसाला सातत्याने खुणावत असतात. सध्याचा जमाना डिजिटल प्लॅटफॉर्मचा आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. डिजिटल क्रांतीने सर्वसामान्य नागरिकांचे जीवन अतिशय सोपे, पारदर्शक आणि वेगवान होत चालले आहे.बँकिंग, कृषी, शिक्षण, शासकीय नियोजन आणि व्यवसाय अशा एक ना अनेक क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढत चालला आहे हे जरी खरे असले तरी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या अतिरेकी वापरामुळे लोकांच्यातील संवाद कमी होऊ नये. अफवा आणि खोटी माहिती वेगाने पसरू नये, त्यातून समाजात गैरसमज आणि तणाव निर्माण होऊन समाजाचे शाररीक आणि मानसिक स्वास्थ्य बिघडू नये याची काळजी घ्यावीच लागेल.**

माणसाला माणसात आणि माणसासारखे राहायला आवडते यावरचा हळूहळू विश्वास वाढू लागला आहे असे म्हटले तर अनेकांना ते पटणार नाही. मात्र माणूस समाजप्रिय प्राणी आहे आणि 'संवाद' हा त्याच्या जीवनाचा पाया आहे हे आपणास विसरून कसे चालेल. संवादातूनच विचारांची देवाणघेवाण होते, एवढ्यावरच ते थांबत नाही तर त्यातून नातेसंबंध अधिक दृढ होतात.त्यातूनच भावना व्यक्त होतात. माणसाचे संवाद साधण्याचे मार्ग वेगवेगळे असले तरी संवाद महत्वाचा आहे. संवाद फक्त शब्दांतूनच नाही, तर मौन, कृती आणि नजरेतूनही साधला जातो. संवाद आणि भावना यांचे एक वेगळे अतूट नाते आहे. भावना व्यक्त केल्यामुळे मनावर आलेला ताण दूर होतो. चांगला संवाद माणसाला एकटेपणातून बाहेर काढतो. एवढेच नव्हेतर तोअनेक समस्यावरील रामबाण उपाय आहे.

माध्यम कोणतेही असुदे संवाद महत्वाचा २१ व्याशतकात माणसाने कात टाकली असून त्याने संवादाचे मार्ग बदलले आहेत. ते अनेकांना रुचत नाहीत मात्र त्याला पर्याय राहिला नाही. माणसाला हातात संवाद साधण्यासाठी अनेक आयुधे हाती



मिळाली आहेत. त्यामुळे सध्याच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानामुळे संवाद साधणे खूप सोपे झाले आहे. प्रत्यक्ष समोरासमोर होणाऱ्या संवादाची जागा नवनवीन तंत्रज्ञानाने घेतली आहे. असे जरी असले तरी मौखिक संवादाचे महत्त्व आजही अबाधित आहे.माणसाला बोलता येते हेच त्याचे सर्वात मोठे भांडवल आहे. त्याला वाचेचं वरदान आहे असल्यामुळेच त्याचे महत्व अबाधित आहे. त्यामुळे संवाद न संपणे हेच माणसाच्या दृष्टीने हिताचे आहे. संवाद संपला किंवा संपवला कि मागे उरते ती फक्त तडफड. संवाद संपला की तर्क वितर्क सुरू होतात त्यातून गैरसमज जन्मास येतात. २१ व्या शतकात माणसाला संवाद साधण्याचा राजमार्ग सापडला आहे तो म्हणजे डिजिटल प्लॅटफॉर्म. डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे अर्थात सोशल मीडिया, ई-कॉमर्स, आणि प्स यामुळे व्यवसाय, शिक्षण आणि दैनंदिन जीवनात एक वेगळी क्रांती झाली आहे.डिजिटल



ज्ञान-तंत्रज्ञान

**इंजि. ऋतुराज ठिगळे**

प्लॅटफॉर्ममुळे वेळ आणि खर्चाची बचत झाली. व्यापक बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे कोणत्याही वेळी, कुठूनही काम करता येते. एवढेच नव्हेतर भौगोलिक मर्यादा ओलांडून जगभरातील ग्राहकांपर्यंत किंवा लोकांपर्यंत पोहोचणे सोपे झाले आहे. पारंपारिकव्यवसायांच्या पद्धती बदलून डिजिटल युगात डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे जाहिरात, विपणन (ारीज्ञशींळपस) करणे शक्य झाले असून त्यामुळे त्यावरील होणारा खर्च कमी होतो आहे. त्याबरोबरच स्वयंचलितपणा आल्यामुळे त्रुटी कमी होऊन उत्पादकता वाढू लागली आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या माहितीचे विश्लेषणकरणे आणिअचूक धोरणे आखणे शक्य होऊ लागले आहे. सर्वात म्हणजे डिजिटल प्लॉटफार्म म्हणजे दिवसाचे २४ तास आणि आठवड्याचे ७ दिवस सेवा उपलब्ध राहिल्यामुळे ग्राहकांना कधीही खरेदी किंवा संवाद साधने शक्य झाले आहे. आजच्या युगात डिजिटल प्लॅटफॉर्मचे महत्त्व आगळेवेगळे आहे.डिजिटल क्रांतीने सर्वसामान्य नागरिकांचे जीवन अतिशय सोपे, पारदर्शक आणि वेगवान बनवले आहे. बँकिंग, कृषी, शिक्षण, शासकीय नियोजन आणि व्यवसाय या प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे

डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे कृषी क्षेत्रात अनेक बदल होऊ लागले आहेत. शेतकरी आणि कृषी क्षेत्रासाठी असणाऱ्या ई-नामफॉर ग्रीकल्चर (e-N-M² सारख्या प्लॅटफॉर्मनेशेतकऱ्यांना थेट राष्ट्रीय बाजारपेठेशी जोडले आहे. तसेच, जमिनीची माहिती आणि हवामानाचा अंदाजशेतकऱ्यांपर्यंत डिजिटल पध्दतीने पोहोचत आहेडिजिटल फार्मर आयडीसारखी सोय होऊ लागली आहे. विविध शासकीय योजनांची माहिती मिळवणे, पात्रता तपासणे आणि ऑनलाइन अर्ज करणे शक्य झाले आहे.अनेक शेतकरी त्याचा लाभ घेत आहेत. डिजिटल व्यवहाराला चालना मिळाली असूनयुनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (UPI ने आर्थिक व्यवहारांमध्ये क्रांती घडवून आणली आहे. यामुळे रोख रकमेविना व्यवहार करणे खूप सोपे झाले आहे. अतिरेकी वापर हा घातक 'अति तिथे माती' म्हणतात तेच खरे आहे एकाद्या तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर हा घातकच असतो. डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा अतिवापर किंवा अयोग्य वापर केल्यामुळे अनेक शाररीक आणि मानसिक समस्या तयार होऊ लागला आहेत. मानवी जीवनावर त्याचे अनेक नकारात्मक परिणाम होऊ लागले आहेत.सतत स्क्रीनकडे बघत राहिल्यामुळे डोळ्यांचे आजार, निद्रानाश आणि ताणतणाव वाढू लागले आहेत. ऑनलाइनमुळे निराशावाद उफाळू लागल आहे. आपली गोपनीयता धोक्यात येऊ लागली आहे.

सोशल मीडिया आणि इतर प्लॅटफॉर्म्सवर वैयक्तिक माहिती सुरक्षित राहण्याची शक्यता गृहीत धरणे शुद्ध वेडेपणाचे आहे. डेटा चोरी, फसवणूक आणि सायबर गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. मोठ्या प्रमाणावर वेळेचा दुरुपयोग वाढतो आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म्सचे अल्गोरिदम अशा प्रकारे बनवलेले असतात की वापरकर्त्याला त्याचे व्यसन जडते. यामुळे उत्पादकतेवर परिणाम होतो आहे. मुलांची अभ्यासातील एकाग्रता भंग पावते आहे. त्याबरोबरच लोक प्रत्यक्ष भेटण्यापेक्षा किंवा संवाद साधण्यापेक्षा मोबाईलच्या माध्यमातून आभासी जगात जास्त वेळ घालवतात त्यामुळे कौटुंबिक आणि सामाजिक संबंध दुरावून एकाकीपण वाढत चालले आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे अलीकडच्या काळात देशातील तरुणाई डिजिटल प्लॅटफॉर्मवर आरूढ झाली असून सतत एकाच जागेवर बसून काम करणे किंवा मोबाईल वापरल्यामुळे पाठदुखी, मानदुखी आणि लठ्ठपणा यांसारख्या समस्या उद्भवल्या आहेत. भारतासारख्या देशाचा विचार केलातर डिजिटल प्लॅटफॉर्म हे विकसित होण्याचे सर्वात मोठे माध्यम आहे हे जरी खरे असले तरी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून खोट्या माहितीचा प्रचार आणि प्रसार होत आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यातून निर्माण होणारे गैरसमज आणि तणाव भारतासारख्या देशाला सर्वच अर्थाने न परवडणारे आणि विकासाला मारक आहेत. त्यामुळे डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करीत असताना तारतम्य ठेवावे लागेल. तरच विकासाची प्रक्रिया गतिमान होईल.

---

# नैतिकतेची निरवता

**"नैतिक आणि अनैतिक असे दोन तात्विक प्रवाह समाजात अव्याहत सुरु असतात. ज्याप्रमाणे माणसाच्या मनात सदैव चुक की बरोबर याचा गोंधळ सुरु असतो तसाच नैतिक आणि अनैतिक याचा पण अखंड पिंगा सुरु असतो. अर्थात या कल्पना जरी व्यक्तीसापेक्ष असल्या तरी त्याची मुल्यात्मक जाणीव मात्र अखंड टिकून असते आणि काळ जसा पुढे पुढे जातो तशी ती प्रसंगी धुसर होत जाते. पण टिकून राहते हे महत्वाचे आहे.**

महाभारत, रामायण या दोन मानवाने निर्माण केलेल्या शाश्वत जीवन मुल्यावर असंख्य नव्हेत तर अगणित साहित्य कृती आणि कलाकृती निर्माण झालेल्या आहेत. महाभारत, रामायण हे तर भारतीय मनाला श्वास नि:श्वासासारखे आहेत. तसेच शेक्सपिअरने निर्माण केलेले मानवी जीवनाचे प्रश्न आजही आपल्या मनाच्या भुपृष्ठावर अखंड तेवत असतात.



साहित्य

**प्रा. वैजनाथ महाजन**

यातून अगदी साध्या साध्या प्रसंगातूनसुध्दा माणूस काही ना काही बोध घेत आला आहे. माध्यमे कितीही बदलली झपाट्याने पुढे जात राहीली तरी मानवी मूल्यांचा सहसा ऱ्हास होत नाही. काहीवेळा तात्पुरती अशी जरूर संकटाची मालिका उभी राहत असते. ती पण आपणाला शिकवून जात असते. लोकामान्य टिळकांनी त्यांच्या बालपणी मी शेंगा खाललेल्या नाहीत तेव्हा ही टरफले मी उचलणार नाही. असे सांगून आपणाला नैतिकतेचा फार मोठा धडा दिला आहे. आणि तेवढाच मोठा दिलासाही दिला आहे. अर्थात हे सगळे पुन्हा आपण काय मानतो कुणाला मानतो आणि त्यामागे आपला नेमका हेतु काय, यावर निर्भर असते. कोकणातील एका तालुक्याच्या गावी व्याने सुरु झालेल्या महाविद्यालयात एका नामवंत प्राचार्याची नेमणूक झाली रितसर शैक्षणिक व्यवहार सुरु



झाले. तरीपण महाविद्यालयाला स्वत:ची जागा नव्हती याचा फार मोठा विशाद प्राचार्यांना वाटत असे. अशातच त्याच भागातील एका तस्कराने म्हणजेच स्मगलरने मी आपल्या महाविद्यालयाला मोफत चार एकर जमीन देतो, असे सांगितले. संस्थाचालक तयार झाले. आणि प्राचार्य मात्र या बाबीला मान्यता देण्यास तयार झाले नाहीत. प्राचार्यांचे म्हणणे असे की, स्मगलरने दिलेल्या जागेवर जर आपण आपली इमारत उभी केली तर ती तिथल्या विद्यार्थ्यांना मी काय सांगणार आणि काय शिकवणार त्यांचा मुद्दा बिनतोड होता. पण संस्थाचालक आयती मिळालेली जमीन सोडण्यास तयार होईनात तेव्हा अखेरीस प्राचार्यांनी मी यासाठी राजीनामा देतो आणि तुम्ही काय निर्णय घ्यायचे ते घ्या, असे सांगून दुसऱ्या दिवशी त्यांनी ते गाव सोडले. या घटनेकडे आज भिन्न-भिन्न दृष्टीकोनातून पाहिले जात आहे. काही लोक म्हणतात की, संस्थाचालकांना जर चार एकर जमीन घेणे शक्य नसेल तर त्यांनी हा प्रस्ताव मान्य केला यात त्यांची काय चुक आणि प्राचार्यांनी हे आपणाला मान्य नाही असे ठणकावून सांगितले त्यात त्यांची काय चुक एकाचवेळी हा प्रश्न नैतिक आणि अनैतिक अशा दोन्ही क्षेत्रात गुंतलेला दिसतो. कारण अखेरीस आपण कोणत्या मुल्य संकल्पना मनोमन स्विकारतो यावरच आपल्या नैतिकतेचे आणि अनैतिकतेचे काटे फिरत राहत असतात.

---

# साप्ताहिक राशी भविष्य

## दि. २१ जून २०२६ ते २७ जून २०२६

**मेष :**



आर्थिकदृष्ट्या आजचा दिवस अतिशय महत्त्वाचा आहे. बरेच दिवस ठरवलेले निर्णय अमलात आणा. कामात कोणतीही चालढकल करू नका. भाग्योदयाची मिळणारी संधी डावलू नका. कितीही अवघड वाटणारे काम एखाद्या मित्राच्या मदतीने सहज बाजूला कराल. पैसा, प्रसिध्दी आणि नावलौकिक यापैकी एखाद्या महत्त्वाचा धागा हाती येणे शक्य. आर्थिकदृष्ट्या आजचा दिवस अतिशय महत्त्वाचा आहे.

**वृषभ :**



आज आपल्यासाठी फार मोठे निर्णय घेण्यासारखी ास्थिती नाही. गोंधळलेल्या ास्थितीतून बाहेर येण्यासाठी थोरा-मोठ्यांचा स'ा हाताशी ठेवा. मित्र परिवार खरेच कोणत्या अर्थाने आपल्या जवळ येतो आहे ते लक्षात घ्या. एखाद्या जुन्या ओळखीचा फायदा घेणाराही भेटू शकतो. आर्थिकदृष्ट्या आज आपण मांडत असलेले गणित बऱ्याचअंशी जमणार आहे.

**मिथुन :**



जोडीदाराची मिळणारी साथ, ऐनवेळेस धाऊन येणारे सहकारी, वरिष्ठांचा मिळणारा वरदहस्त अशा काही घटनांबरोबरच गोड बोलून आपणाकडून पार्टी उकळणारेही मित्र आज भेटणार आहेत. स्वत:ला नसता मोठेपणा देऊ नका. संशोधन कार्यात स्वत:ला मग्न ठेवा. कामाचा कोणताही बाऊ करू नका. आपणास न पचणारा पदार्थ कोणाच्या आग्रहाखातर अजिबात खाऊ नका.

**कर्क :**



मागे ठरविलेले अनेक महत्त्वाचे निर्णय प्रत्यक्षात आणू शकाल. आपल्यावर अवलंबून असलेल्या लोकांसाठी काही वेगळे करण्याची संधी मिळेल. हस्तगत असलेली विद्या उपयोगात येईल. नोकरी-व्यवसायात कोणतेही वाद होणार नाहीत हे पाहणे आवश्यक. विशेषत: देण्या-घेण्याचे व्यवहार वादग्रस्त होऊ देऊ नका. नव्या कामात रस घ्याल, आर्थिक डोलारा सहज सांभाळता येईल.

**सिंह :**



नात्यातले लोक, मित्र यांच्यासोबत फिरणे होईल. खाण्यापिण्याचीही लयलूट कराल. नोकरी-व्यवसायात महत्त्वाच्या निर्णयामध्ये आपणास सहभागी करून घेतले जाईल. बुध्दी कौशल्यांचा चांगलाच उपयोग होईल. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांना आजचा दिवस विशेष महत्त्वाचा. लेखन, प्रसिध्दी आणि प्राप्ती याबाबतीत काही चांगल्या घटना अपेक्षित.

**कन्या :**



विरोधी गटातली एखादी महत्त्वाची बातमी हाती येईल. अनपेक्षित प्रवास घडेल. नको त्या लोकांशी संगत मात्र होणे शक्य. त्यातून आपले कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घ्या. एखाद्या मित्राने मदतीसाठी पुढे केलेला हात आपणास टाळता येणार नाही. वडिलांच्या किंवा भावंडांच्या संबंधात एखादे महत्त्वाचे काम हाती घ्यावे लागेल. वैवाहिक जीवनात किरकोळ कारणांनी फार मोठे प्रसंग येऊ देऊ नका.

**तूळ :**



घरगुती कामांकडे आज जास्त लक्ष द्यावे लागेल. सिनेमा, नाटक अशा काही मनोरंजनाच्या साधनांनाही महत्त्व द्याल. इंजिनिअरींग क्षेत्रात असणाऱ्यांना आज एखादा अनपेक्षित शोध लागल्याचे समाधान मिळेल. आर्थिकदृष्ट्या ठरविलेली कामे मनासारखी पूर्ण करून घेता येतील. आवडीच्या लोकांबरोबर राहण्याची संधी मिळेल. कला क्षेत्रातून आनंद लुटता येईल. फिरते विक्रेते, किराणा धान्य दुकानदार आणि औषध विक्रेत्यांसाठी आजचा दिवस विशेष चांगला.

**वृश्चिक :**



आपल्या राशीत असलेला आजचा चंद्र आपणास अभिमान वाटावा, अशा एखाद्या घटनेचा साक्षीदार ठरू शकतो. नोकरी-व्यवसायात घेतला गेलेला निर्णय, एखाद्या वाटसरुला किंवा अनोळखी व्यक्तीला केलेली मदत, झटपट उरकलेली कामे आणि स्वत:वर ठेवलेला संयम यातून स्वत:ला मोठे करण्याची संधी मिळेल. नवे मित्र जोडले जातील.

**धनु :**



आपल्या मोठ्या मनाचा गैरफायदा कोण घेत नाही ना याची काळजी घेत आजच्या दिवसातली कामे आपणास उरकायची आहेत. हाती येणारा पैसा योग्य ठिकाणीच जाईल असे पाहा. देवदर्शन, एखादे धार्मिक कृत्य किंवा सत्सशील माणसांची गाठ यापैकी एखादा प्रसंग आज घडणे शक्य. त्यातून मोठे समाधान हाती येईल. गोडधोड खायला मिळेल. पत्राद्वारे एखादी चांगली बातमी कानी येईल. आर्थिकदृष्ट्या आजचा दिवस विशेष महत्त्वाचा ठरावा.

**मकर :**



आर्थिकदृष्ट्या कोणतेही निर्णय चुकणार नाहीत याची काळजी घ्या. नको तिथे साहस दाखवायला जाऊ नका. पोलिस किंवा सैन्यात नोकरी करणाऱ्यांनी स्वत:चा राग आवरलेला बरा. उष्णतेचा विकार असणाऱ्यांनी आज स्वत:ला सांभाळावे. आर्थिकदृष्ट्या एकादा झटपट होणारा व्यवहार बऱ्यापैकी फायद्याचा पडू शकतो. आर्थिकदृष्ट्या कोणतेही निर्णय चुकणार नाहीत याची काळजी घ्या. नको तिथे साहस दाखवायला जाऊ नका.

**कुंभ :**



कामाच्या ठिकाणी कोणताही निर्णय चुकणार नाही याची काळजी घ्या. अधिकारी पदावर असाल तर हाताखालील लोकांशी वाद मुळातूनच टाळा. भागीदारी व्यवसायात भागीदाराचे म्हणणे ऐकावे लागेल. आपले विक पॉईंट कोणाला कळणार नाही याची खबरदारी घेत आजचा दिवस पुढे न्या. नोकरदारांना एखादा जास्तीचा अधिकार हाती येईल. व्यापारी वर्गाला व्यापारासाठी जवळपासचा अनपेक्षित प्रवास करावा लागेल.

**मीन :**



आपल्या अज्ञानाचा फायदा घेऊन कोणी आपल्याला फसवत तर नाही ना याची काळजी आज आपणास घ्यायची आहे. गोड बोलणाऱ्यांपासून दोन हात दूर राहा. आरोग्याच्या बाबतीत उगाच स्वत:चाच हेका चालवू नका. प्रेमी जणांनी फार टोकाचे निर्णय आज घेणे हितकारक नाही. उधारी वसुलीवर मात्र आज विशेष लक्ष देऊ शकता. एखादे केलेले सत्पात्री दान विशेष समाधान देईल.

# खताचा काळाबाजार आणि साठेबाजीवर कृषी विभागाची मोठी कारवाई; ११३ परवान्यांवर कारवाई, ७ गुन्हे दाखल

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** शेतकऱ्यांना दर्जेदार आणि रास्त दरात खतांचा पुरवठा व्हावा यासाठी कृषी विभागामार्फत पुणे विभागातील पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये खत विक्री केंद्रांची कडक तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. एप्रिल २०२६ पर्यंत विभागात नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली असून आतापर्यंत १०७ खत विक्री परवाने निलंबित आणि ६ खत विक्री परवाने रद्द करण्यात आले आहेत, तर ७ केंद्रांवर गुन्हे (एफआयआर) दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी दिली आहे.



या मोहिमेअंतर्गत पुणे विभागात एकूण २ हजार ५७६ परवानाधारक केंद्रांची तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान २८१ प्रकरणांमध्ये काळाबाजार झाल्याचे समोर आले असून, २७७ केंद्रांना 'कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. यामध्ये पुणे जिल्ह्यातील ६५० केंद्रांची तपासणी करण्यात आली. यापैकी ७१ प्रकरणांत अनियमितता आढळली असून २७ परवाने निलंबित करण्यात आले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात ८१२ केंद्रांची तपासणीनंतर १६ खत विक्री परवाने निलंबित आणि २ खत विक्री परवाने रद्द करण्यात आले असून ३ केंद्रांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक १ हजार १२९ केंद्रांची तपासणी करण्यात आली. १८ प्रकरणांमध्ये खतांचे नमुने निकृष्ट आढळले आहेत. जिल्ह्यात एकूण ६४ परवाने निलंबित आणि ४ खत विक्री परवाने रद्द करण्यात आले असून ४ केंद्रांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याशिवाय, अनुदानित युरियाचा औद्योगिक कारणांसाठी वापर टाळण्यासाठी विभागात ४२ औद्योगिक युनिट्सना भेटी देण्यात आल्या आहेत. कृषि विभागातर्फे खतांचा काळाबाजार, कृत्रिम टंचाई, साठेबाजी आणि चढ्या दराने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर यापुढेही कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा श्री. जेजुरकर यांनी दिला आहे. अधिकृत परवानाधारक कृषि केंद्रातूनच खत खरेदी करावे आणि काही तक्रार आल्यास नजीकच्या कृषि विभागाच्या कार्यालयास संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

कारवाईच्या वेळी पुणे अधिक्षक कृषि अधिकारी विजयकुमार राऊत, तंत्र अधिकारी निलेश गढरी, विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक अतुल जाधव आदी उपस्थित होते.

# मंचर पोलिसांची कारवाई; विद्युत वाहिनीच्या तारांची चोरी करणारा सराईत गुन्हेगार जेरबंद

■ जनप्रवास प्रतिनिधी

**मंचर :** अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) येथील खेडकर मळा परिसरात अभियांत्रिकी महाविद्यालयाजवळ गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या विद्युत वाहिनीच्या अॅल्युमिनियम तारांच्या चोरीप्रकरणी मंचर पोलिसांनी मोठी कारवाई करत सराईत गुन्हेगाराला अटक केली आहे. आरोपीकडून ४ लाख ४० हजार रुपये किमतीचे ११०० किलो वजनाचे अॅल्युमिनियम तारांचे बंडल जप्त करण्यात आले आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मयूर दत्तात्रय खेडकर (वय ३५, रा. अवसरी खुर्द, ता. आंबेगाव) यांच्या घरासमोर ठेवलेले ४ लाख ४० हजार रुपये किमतीचे अॅल्युमिनियम तारांचे बंडल अज्ञात चोरट्यांनी दि. २६ मे ते १३ जून २०२६ या कालावधीत चोरी करून नेले होते. याप्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांनी विशेष तपास पथकाची नियुक्ती केली. पोलिसांनी कसून तपास करून विजय भाऊसाहेब गायकवाड (वय ४६, रा. आळेफाटा, ता. जुन्नर) याला अटक केली. आरोपीकडून चोरीस गेलेले संपूर्ण ४ लाख ४० हजार रुपये किमतीचे ११०० किलो वजनाचे अॅल्युमिनियम तारांचे बंडल हस्तगत करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ, पोलीस उपनिरीक्षक यशवंत यादव, पोलीस हवालदार तान्हाजी हगवणे, संजय नाडेकर, नंदकुमार आढारी, शेखर भोईर तसेच पोलीस अंमलदार योगेश रोडे, अजित पवार, हनुमंत ढोबळे यांनी केली. पुढील तपास पोलीस हवालदार तान्हाजी हगवणे करीत आहेत.

# सर्वसामान्य कार्यकर्त्यापासून जिल्हा उपाध्यक्षपदापर्यंतचा प्रवास; दत्तात्रय कदम यांच्यावर पक्ष नेतृत्वाचा विश्वास

## टाकलेला विश्वास सार्थ ठरवत पक्षवाढीसाठी पूर्ण ताकदीने काम करणार : दत्तात्रय कदम

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**इंदापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पुणे जिल्हा ग्रामीण उपाध्यक्षपदी निवड झाल्याने इंदापूर तालुक्यातील सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेले आणि पक्षासाठी निस्वार्थपणे काम करणारे दत्तात्रय दशरथ कदम यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या निवडीमुळे इंदापूर तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

इंदापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष हनुमंत कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी दत्तात्रय कदम यांनी सातत्याने काम केले आहे.

पक्षाच्या प्रत्येक उपक्रमात, जनआंदोलनात आणि संघटनात्मक कार्यक्रमात त्यांनी सक्रिय सहभाग घेत तळागाळातील कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या दत्तात्रय कदम यांनी कोणत्याही मोठ्या राजकीय वारशाशिवाय आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर पक्षात स्वतंत्र ओळख निर्माण केली. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, मधुकर भरणे तसेच तालुका अध्यक्ष हनुमंत कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पक्षवाढीसाठी सातत्याने मेहनत घेतली. त्यांच्या निष्ठा, प्रामाणिकपणा आणि संघटन कौशल्याची दखल घेत पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर पुणे जिल्हा ग्रामीण उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना तालुका अध्यक्ष हनुमंत कोकाटे म्हणाले, ''दत्तात्रय कदम हे पक्षाचे अत्यंत निष्ठावंत, अभ्यासू आणि तळागाळातील कार्यकर्त्यांशी घट्ट नाते जपणारे कार्यकर्ते आहेत. त्यांच्या निवडीमुळे इंदापूर तालुक्याचा सन्मान वाढला असून पक्ष संघटनेला निश्चितच नवे बळ मिळेल.''

नियुक्तीनंतर बोलताना दत्तात्रय कदम यांनी सांगितले, ''मी सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेला कार्यकर्ता आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, तालुका अध्यक्ष हनुमंत कोकाटे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. हा विश्वास सार्थ ठरवत पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी आणि पक्षवाढीसाठी पूर्ण ताकदीने काम करणार आहे.''



दत्तात्रय कदम यांच्या निवडीमुळे इंदापूर तालुक्याला जिल्हा पातळीवर अधिक सक्षम प्रतिनिधित्व मिळणार असून आगामी काळात पक्ष संघटना अधिक बळकट होईल, असा विश्वास कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. त्यांच्या निवडीबद्दल तालुकाभरातून शुभेच्छांचा वर्षाव सुरू आहे.

# योग संस्कारांची शिदोरी; श्री नारायणदास रामदास हायस्कूलमध्ये योग दिन उत्साहात

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**इंदापूर :** इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री नारायणदास रामदास हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. पतंजली योग परिवार व महिला पतंजली योग समिती, इंदापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.



यावेळी विद्यार्थ्यांना शालेय जीवनात योगाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते, तसेच एकाग्रता, आत्मविश्वास आणि सकारात्मकता वाढते, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. योगशिक्षिका निता नलवडे, मंगल वाघ, मनीषा काळे आणि वासंती गानबोटे यांनी विविध योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके सादर करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय सोरटे, उपमुख्याध्यापिका मनीषा कांबळे तसेच पर्यवेक्षिका शारदा जगताप उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडाशिक्षक अण्णासाहेब खटके, राजेंद्र जगताप, संतोष पवार, भगवान मोरे, शंकर गुळीग, शहाजी येरळकर, तानाजी गलांडे, सुरज पठारे आणि सुहास जगताप यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता फडतरे यांनी केले, तर गणेश देवकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

''योग ही निरोगी जीवनशैलीची गुरुकिल्ली असून विद्यार्थ्यांनी नियमित योगाभ्यास करून निरोगी व सक्षम नागरिक बनावे,'' असा संदेश यावेळी देण्यात आला.

# योग ही निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवनाची गुरुकिल्ली आहे : पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** २१ जून जागतिक योग दिनानिमित्त स्नेहबंध सोशल फाउंडेशन, अहिल्यानगर (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने नागरिकांना शुभेच्छा देणाऱ्या विशेष पोस्टरचे अनावरण जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे उपस्थित होते.




यावेळी बोलताना पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन म्हणाले, ''योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक आरोग्यासह मानसिक स्वास्थ्यही उत्तम राहते. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत प्रत्येकाने योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवणे आवश्यक आहे.''

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, ''निरोगी समाज घडविण्यासाठी योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. योगामुळे शरीर सुदृढ, मन शांत आणि विचार सकारात्मक राहतात. जागतिक योग दिनाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकाने नियमित योग करण्याचा संकल्प करून निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करावा.''

# एफडीएच्या धाडीनंतर नाट्यमय घडामोडी; पोलीस कोठडीतून निसटलेल्या आरोपीमुळे सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

■ जनप्रवास प्रतिनिधी

**इंदापूर :** प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूच्या अवैध व्यापाराविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) इंदापूरात केलेल्या मोठ्या कारवाईनंतर संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. तब्बल २ लाख ४१ हजार १४० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याचा साठा जप्त करण्यात आला. मात्र, या कारवाईनंतर पोलीस ठाण्यात चौकशीसाठी आणलेला आरोपी संशयास्पदरित्या पसार झाल्याने प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली. अखेर तब्बल ८० किलोमीटर पाठलाग करून आरोपीला वडगाव निंबाळकर परिसरातून ताब्यात घेण्यात आले.


ही घटना केवळ गुटखा कारवाईपुरती मर्यादित न राहता, पोलीस ताब्यातील आरोपीच्या सुरक्षेचा प्रश्न, अधिकाऱ्यांची जबाबदारी आणि कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी यांवरही गंभीर चर्चा निर्माण करणारी ठरली आहे.

शुक्रवारी सकाळी अन्न सुरक्षा अधिकारी लक्ष्मीकांत सावळे यांच्या नेतृत्वाखाली संतोष सावंत, विजय सोनवणे, समृद्धी चव्हाण आणि अक्षय शेळके यांच्या पथकाने इम्रान हुसेन शेख (वय ३८) याच्या संबंधित ठिकाणी छापा टाकला. सुरुवातीच्या झडतीत काहीही आढळून न आल्याने पथकाने तपासाची दिशा बदलली.

यानंतर जुन्या पुणे–सोलापूर महामार्गालगत असलेल्या 'ए बी एस शॉपिंग कॉर्नर' मधील गाळा क्रमांक ६ मध्ये छापा टाकण्यात आला. तेथे प्रिमियम आरएमडी, विमल, व्ही–१ कंपनीचा पानमसाला आणि सुगंधित तंबाखूचा मोठा साठा आढळून आला. दोन पंचांच्या उपस्थितीत जप्तीची कारवाई करण्यात आली.

**पोलीस ठाण्यातूनच आरोपी फरार!**

कारवाईनंतर आरोपीला चौकशीसाठी इंदापूर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. मात्र काही वेळातच आरोपी पोलीसांच्या नजरेआड होऊन पसार झाल्याचे समोर आले. ही बाब उघड होताच पोलीस यंत्रणेत एकच खळबळ उडाली. जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना सतर्कतेचा संदेश पाठविण्यात आला.



तांत्रिक तपास, गोपनीय माहिती आणि वेगवान हालचालींच्या जोरावर इंदापूर पोलिसांनी आरोपीचा माग काढत सायंकाळी वडगाव निंबाळकर परिसरात त्याला जेरबंद केले. त्यानंतर त्याला पुन्हा इंदापूर येथे आणून अटक करण्यात आली.

**कायदेशीरदृष्ट्या गंभीर बाब**

प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूची विक्री आणि साठवणूक ही अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ (Food Safety and Standards Act, 2006) अंतर्गत दंडनीय बाब आहे. महाराष्ट्र शासनाने गुटखा व सुगंधित तंबाखूवर बंदी घातलेली असताना अशा पदार्थांची विक्री, वाहतूक व साठवणूक केल्यास कठोर कारवाईची तरतूद आहे. तसेच, पोलीसांच्या ताब्यात असलेला आरोपी पळून जाणे ही बाबही अत्यंत गंभीर मानली जाते. अशा प्रकरणात आरोपीविरुद्ध स्वतंत्र गुन्हा दाखल होण्याबरोबरच संबंधित सुरक्षेतील त्रुटींची चौकशी होऊ शकते.

**नागरिकांचा सवाल**

गुटखा जप्तीची कारवाई यशस्वी ठरली असली तरी, ''पोलीस ठाण्यातून आरोपी कसा पळाला?'', ''जबाबदार कोण?'' आणि ''सुरक्षेतील त्रुटींवर कारवाई होणार का?'' असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. गुटखा माफियांवर कारवाई करणाऱ्या यंत्रणांचे कौतुक होत असतानाच आरोपीच्या पलायनामुळे प्रशासनाची प्रतिमाही डागाळल्याची चर्चा शहरात रंगली आहे. त्यामुळे या प्रकरणातील पुढील चौकशी आणि जबाबदारी निश्चितीवर आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

## विश्वशांती घुमटाच्या साक्षीने सामूहिक योगासने; 'निरोगी वृद्धत्वासाठी योग'चा संदेश

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' या संकल्पनेवर आधारित येथील एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एडीटी) विद्यापीठात सामूहिक योगासनांच्या प्रात्यक्षिकांद्वारे १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. समग्र विश्वाला शांततेचा संदेश देणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज विश्वशांती घुमटाच्या साक्षीने झालेल्या या योगोत्सवात विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी उपस्थितांनी निरोगी जीवनासाठी दररोज योगाभ्यास करण्याचा संकल्प केला.

हा आंतरराष्ट्रीय योग दिन जगातील सर्वात उंच 'विश्वशांती घुमट' या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे साजरा करण्यात आला. विज्ञान आणि अध्यात्माचा अनोखा संगम साधणाऱ्या या भव्य घुमटाची संकल्पना व निर्मिती माईर्स शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी केली आहे.



भारत सरकारच्या आयुष मंत्रालय, आंतरराष्ट्रीय नॅचरोपॅथी संघटना, मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थान, आर्ट ऑफ लिव्हिंग, सूर्या फाउंडेशन आणि एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या भव्य योगोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्र–कुलगुरू डॉ. मोहित दुबे, परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव निलवर्ण, स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंटचे संचालक व कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक डॉ. अतुल पाटील, क्रीडा विभागाचे संचालक प्रा. पद्माकर फड, कॅम्पस संचालक दिलीप पाटील आदी उपस्थित होते.

# सावित्रीबाई फुले विद्यालयात शालेय साहित्य वाटप

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** सावित्रीबाई फुले विद्यालय ओतूर (ता.जुन्नर) विद्यालयातील गरीब, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. शालेय साहित्यामध्ये स्कूल बॅग, स्कूल युनिफॉर्म, वॉटर बॉटल, वह्या, कंपास पेटी मधील साहित्य,पाऊच इत्यादी शालेय उपयोगी वस्तूंचा समावेश होता.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य सखाराम हांडे हे होते. शालेय साहित्यासाठी कैलास तांबे (माजी प्राध्यापक एमआयटी पुणे व सध्या ग्लोबल लॉजिक सॉफ्टवेअर इंजिनीयर) शिवप्रसाद ढोंबे (पी आर आर स्क्राईब कंपनी चेन्नई ) तसेच वाजे गुळाचा चहाचे संचालक राहुल तांबे इत्यादी दानशूर व्यक्तींचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याच्या किटचे वाटप करण्यात आले. भविष्यात अधिक विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू असे आश्वासन कैलास तांबे यांनी दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास डुंबरे तर आभार प्रदर्शन संभाजीराव शिंदे यांनी केले.

## संक्षीप्त वृत्त

### सीताभाभी ठक्कर यांचे निधन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीरामपूर :** येथील वार्ड नं ३ सावता महाराज रोड परिसरात वास्तव्यास असलेल्या ज्येष्ठ महिला श्रीमती सीताभाभी वृजलाल ठक्कर वय ८७ यांचे वृद्धपकाळाने शुक'वार दि. १९ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात दिर, एक मुलगा, चार मुली, सून, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्या हरिकमल प्लाझा मधील क्विक कुरिअर सर्व्हिसेसचे मालक राजेश ठक्कर यांच्या मातोश्री तसेच कांजी वेलजी ठक्कर यांच्या त्या भावजयी होत.

### आंतरराष्ट्रीय योग दिवस : आयुष्य बदलवणाऱ्या या साधनेबद्दल झी टीव्ही कलाकारांनी मांडले आपले विचार!

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** योग हा आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग राहिला असून तो शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य आणि अंतर्मनातील संतुलन राखण्यास मदत करतो. त्याचे फायदे आपण दररोज अनुभवतो, पण आंतरराष्ट्रीय योग दिवस आपल्याला त्याच्या महत्त्वाची विशेष जाणीव करून देतो. गेल्या काही वर्षांत, विशेषतः कलाकारांनी योगाचा सक्रिय प्रचार केला असून लाखो लोकांना आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण्यासाठी प्रेरित केले आहे. योग हा केवळ व्यायामाचा प्रकार नसून तो सजगता, शिस्त आणि स्वत:शी अधिक सखोल नाते जोडण्यास प्रोत्साहित करतो. यंदाच्या या विशेष दिवशी झी टीव्ही कलाकार 'जाने अनजाने हम मिले' मधील रीत ऊर्फ आयुषी खुराणा, 'जगद्धात्री'मधील माया ऊर्फ सयंतानी घोष आणि 'गंगा माई की बेटियाँ' मधील स्नेहा ऊर्फ अमनदीप सिधू , अभिषेक शर्मा ऊर्फ 'वसुधा'मधील देव, अक्षिता मुद्गल ऊर्फ 'लक्ष्मी निवास'मधील राधिका आणि निहारिका चौक्सी उर्फ 'तुम से तुम तक' मधील अनु यांनी योगामुळे त्यांच्या आयुष्यात झालेल्या सकारात्मक बदलांविषयी आपले अनुभव शेअर केले. 'गंगा माई की बेटियाँ' मध्ये स्नेहाची भूमिका साकारणारी अमनदीप सिधू म्हणाली, दीर्घ काळापासून योग हा माझ्या आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग राहिला आहे. माझ्यासाठी तो फक्त व्यायामाचा प्रकार नाही तर तो मला मानसिकदृष्ट्या संतुलित, एकाग्र आणि सकारात्मक राहण्यास मदत करतो. आमच्या धकाधकीच्या आयुष्यात रोज काही मिनिटे जरी योगासाठी काढली तरी त्याचा खूप मोठा फायदा होतो. योगामुळे शरीर मजबूत होते, लवचिकता वाढते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मनाला शांतता आणि स्पष्टपणा मिळतो. जेव्हा मी योग करते तेव्हा मला स्वत:शी अधिक जोडले गेल्यासारखे वाटते आणि रोजच्या आयुष्यातील आव्हाने पेलण्यासाठी मी अधिक सक्षम होते. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, मी सर्वांना योगाला आपल्या दैनंदिन दिनचर्येचा भाग बनवावे आणि त्याचे अद्भुत फायदे अनुभवावेत यासाठी प्रोत्साहन देते.

### इतिहासातील पर्यावरण विषयावर व्याख्यानाचे आयोजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत वनराई आणि इतिहास प्रबोधन समिती, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने ''इतिहासातील पर्यावरण'' या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, २१ जून २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता स्वा. सावरकर अध्यासन केंद्र, डेक्कन, पुणे येथे होणार आहे. या कार्यक्रमात वनस्पतीशास्त्र तज्ज्ञ, दुर्ग व इतिहास अभ्यासक मा. प्र. के. घाणेकर हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. इतिहासाच्या विविध कालखंडांतील पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे महत्त्व आणि पर्यावरणाशी निगडित ऐतिहासिक संदर्भ यावर ते आपले विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनराईचे विश्वस्त सागर धारिया असतील. तसेच डॉ. प्रा. निवेदिता एकबोटे, नगरसेविका पल्लवी जावळे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. पर्यावरण आणि इतिहास यांचा परस्परसंबंध समजून घेण्यासाठी तसेच पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास पर्यावरणप्रेमी, इतिहास अभ्यासक, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युइटी सुरक्षित ठेवावी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** विविध विभागांत कंत्राटी तत्त्वावर काम करणाऱ्या साडेचार ते पाच हजार कर्मचाऱ्यांच्या ग्रॅच्युइटी (निवृत्ती वेतन लाभ) आणि बोनसचा गंभीर प्रश्नही प्रशासनासमोर मांडला असून कंत्राटी कर्मचाऱ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबवण्यासाठी महापालिकेने थेट 'प्रिन्सिपल एम्प्लॉयर' (मुख्य नियोक्ता) म्हणून जबाबदारी घ्यावी या संदर्भात महापौर रवी लांडगे आणि स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी होकार दर्शवल्याची माहिती राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी पिंपरी येथे (दि.१९) पत्रकार परिषदेत दिली. कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी पत्रकार परिषदेत माहिती देतांना सांगितले की,सध्याच्या प्रथेनुसार महापालिकेचे टेंडर (कंत्राट) बदलले की जुना कंत्राटदार निघून जातो. अनेक वर्षे काम करूनही कर्मचारी निवृत्त झाल्यावर किंवा त्याला कामावरून काढल्यावर त्याला ग्रॅच्युइटी मिळत नाही. नवीन कंत्राटदार 'माझा जुन्या ग्रॅच्युइटीशी काय संबंध?' म्हणून हात झटकून मोकळा होतो, कारण टेंडरच्या अटींमध्ये ग्रॅच्युइटीचा उल्लेखच नसतो.यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महापौर रवीजी लांडगे आणि स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांना एक महत्त्वपूर्ण आणि व्यावहारिक पर्याय सुचवला आहे.यामध्ये कामगाराचे महापालिकेने 'प्रिन्सिपल एम्प्लॉयर' म्हणून एक स्वतंत्र बँक खाते उघडावे.

### अग्निसुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन आवश्यक; संतोष वारीक यांचे प्रतिपादन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** ''राष्ट्रीय बांधकाम संहितेमधील (एनबीसीएस-२०२६) अग्नि व जीवित सुरक्षा नियमांतर्गत राज्यातील सर्व बांधकाम प्रकल्प, डेटा सेंटर, ईव्ही पार्किंग, मेट्रो स्थानके, वेअरहाऊस, तंत्रज्ञान उद्याने यांसारख्या आधुनिक पायाभूत सुविधांसाठी स्वतंत्र अग्निसुरक्षा निकष लागू होणार असून, अग्निसुरक्षा व्यवस्थेत मोठा बदल घडणार आहे,'' अशी माहिती महाराष्ट्र अग्निशमन सेवेचे संचालक व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अग्निशमन अधिकारी संतोष वारीक यांनी दिली. अग्निसुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन आवश्यक असून, जागरूकता आणि पूर्वतयारीनेच जीवित व वित्तहानी टाळता येईल, असेही त्यांनी सांगितले. फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया (एफएसएआय) पुणे चॅप्टरतर्फे आयोजित 'एनबीसीएस-२०२६ डिकोडेड: फायर अँड लाईफ सेफ्टी फॉर मॉडर्न इंडिया' या तांत्रिक परिषदेत वारीक बोलत होते. महाराष्ट्र अग्निशमन सेवा, पुणे महानगरपालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्या सहकार्याने वाकड येथील हॉटेल टिपटॉप इंटरनॅशनल आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र अग्निशमन सेवेचे सहाय्यक संचालक किरण हत्याळ, पीएमआरडीएचे मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे, एनबीसीएस-२०२६ मसुदा समितीचे सदस्य विनोद कापसे, कुनाल कोळपकर आणि ऋतुराज कुलकर्णी उपस्थित होते.

# सोनगाव सात्रळ शिवारात रेशनिंग धान्याचा मोठा साठा जप्त; १२ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल हस्तगत

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कारवाई करण्याच्या मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने राहुरी तालुक्यातील सोनगाव सात्रळ येथे मोठी कारवाई करत रेशनिंगच्या गहू व तांदळाचा साठा तसेच दोन वाहनांसह तब्बल १२ लाख २ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना गोपनीय माहिती मिळाली होती की, सोनगाव सात्रळ येथील यासिर सादिक तांबोळी (वय २६) हा रेशनिंगचा गहू व तांदूळ काळ्या बाजारातून खरेदी करून साई बालाजी फर्निचर शेजारील पत्र्याच्या गोदामात साठवून ठेवत आहे.

माहितीची खातरजमा करून पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे यांच्यासह पोलीस अंमलदार सुनील पवार, रिचर्ड गायकवाड आणि रमीजराजा अतार यांच्या पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. गोदामाची तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात गहू व तांदळाच्या गोण्या तसेच दोन वाहने आढळून आली.



चौकशीत आरोपीने परिसरातील रेशनिंग दुकानांतून धान्य काळ्या बाजाराने खरेदी केल्याची कबुली दिली. कारवाईदरम्यान ६,९९० किलो वजनाच्या गव्हाच्या १२१ गोण्या (किंमत २,०९,७०० रुपये), ५,८६० किलो वजनाच्या तांदळाच्या ११७ गोण्या (किंमत २,९३,००० रुपये) आणि ७ लाख रुपये किमतीची दोन वाहने असा एकूण १२,०२,७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपी यासिर तांबोळी याच्याविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७१३/२०२६ नोंदविण्यात आला असून जीवनावश्यक वस्तू अधिनियमाच्या कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनांनुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली असून जिल्ह्यातील काळाबाजाराविरोधातील ही महत्त्वपूर्ण कारवाई मानली जात आहे.

## बनावट बिलांद्वारे ४५ लाखांचा अपहार; मुख्य आरोपी प्रशांत बल्लाळचा अटकपूर्व जामीन फेटाळला

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** सर्जेपूरा येथील पेशवाई श्रीमंत या दालनात बनावट बिलांच्या आधारे तब्बल ४५ लाख रुपयांचा अपहार आणि आर्थिक फसवणूक केल्याच्या गंभीर आरोपाखालील मुख्य आरोपी प्रशांत राजाराम बल्लाळ याचा अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. १६ जून रोजी झालेल्या या निर्णयामुळे आरोपीच्या अटकेचा मार्ग मोकळा झाला असून प्रकरणातील तपासाला गती मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक २३९/२०२६ मध्ये आरोपी प्रशांत बल्लाळ व इतर तीन जणांविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० आणि ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, मोठ्या प्रमाणात माल खरेदी-विक्रीच्या व्यवहारांमध्ये बनावट बिले आणि कागदपत्रांचा वापर करून ४५ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. या प्रकरणात आरोपींनी संगनमताने फसवणुकीचा कट रचल्याचा आरोप आहे.

या गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध अद्याप सुरू असून, संपूर्ण कटाचा उलगडा करण्यासाठी आणि आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्यासाठी मुख्य आरोपीची कोठडीत चौकशी आवश्यक असल्याचे तपास यंत्रणेकडून न्यायालयास सांगण्यात आले. अटकेच्या भीतीने प्रशांत बल्लाळ याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ च्या कलम ४८२ अंतर्गत अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. बनावट कागदपत्रांच्या आधारे मोठी रक्कम उकळण्यात आल्याचा आरोप असून, गुन्ह्याचा तपास अद्याप अपूर्ण आहे. इतर आरोपींचा शोध घेणे बाकी असल्याने तपास यंत्रणेला आरोपीची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आरोपी प्रशांत बल्लाळ याचे धाबे दणाणले असून, त्याच्या अटकेची शक्यता वाढली आहे.

## मोहरमच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर पोलिसांचे कोंबीग ऑपरेशन; ४ हद्दपारांवर गुन्हे, २४ आरोपींवर वॉरंटची कारवाई

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** आगामी २६ जून २०२६ रोजी होणाऱ्या मोहरम सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अहिल्यानगर पोलिसांनी विशेष कोंबीग ऑपरेशन राबविले. या कारवाईत हद्दपार असलेल्या ४ इसमांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून, २४ आरोपींवर विविध वॉरंटची बजावणी करण्यात आली. तसेच अजामीनपात्र वॉरंटमधील एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

दि. २० जून रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत कोतवाली, तोफखाना आणि भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यांच्या हद्दीत हे विशेष अभियान राबविण्यात आले. यावेळी हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणारे ४ इसम आढळून आल्याने त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच १० पाहिजे व फरार आरोपींची तपासणी करण्यात आली. कारवाईदरम्यान अजामीनपात्र वॉरंटमधील एका आरोपीला अटक करून न्यायालयात हजर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याशिवाय अजामीनपात्र वॉरंटमधील १० आरोपींना व जामीनपात्र वॉरंटमधील १३ आरोपींना वॉरंटची बजावणी करण्यात आली. ही मोहीम पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, कोतवाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, तोफखाना पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य आणि भिंगार कॅम्पच्या सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली. मोहरम सण शांततापूर्ण वातावरणात पार पडावा आणि शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अशा प्रकारच्या प्रतिबंधात्मक कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## तहसीलच्या दारातच कायद्याची पायमल्ली; न्याय मागणाऱ्या शेतकऱ्याला मारहाण, प्रशासनाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

■ जनप्रवास प्रतिनिधी

**इंदापूर :** लोकशाही व्यवस्थेत नागरिकांना आपल्या हक्कांसाठी प्रशासनाकडे दाद मागण्याचा संविधानिक अधिकार आहे. मात्र इंदापूर तहसील कार्यालयाच्या आवारात घडलेल्या एका धक्कादायक घटनेने हा अधिकारच धोक्यात आल्याचे चित्र समोर आले आहे. शेतजमिनीकडे जाणारा वहिवाटीचा रस्ता खुला करण्यासाठी तहसीलदारांकडे निवेदन देऊन बाहेर पडलेल्या शेतकऱ्याला भरदिवसा अडवून मारहाण करण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

आंबिकानगर येथील शेतकरी अमोल प्रभाकर कारंडे (वय ३८) हे आपल्या सहकाऱ्यांसह गट नं. ३३२/१/३/१ मधील वहिवाटीचा रस्ता खुला करण्याच्या मागणीसाठी शुक्रवारी तहसील कार्यालयात गेले होते. निवेदन सादर करून बाहेर पडताच अमोल उत्तम राऊत याने त्यांना अडवून ''तुला रस्ता मिळणार नाही, पुन्हा इथे दिसलास तर याद राख'' अशी धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, त्यानंतर राऊत याने शिवीगाळ करत कारंडे यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यांच्यासोबत असलेल्या अविनाश नवगिरे, संतोष गोरे आणि राजेश झगडे यांनाही जिवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या. विशेष म्हणजे हा प्रकार एखाद्या निर्जन ठिकाणी नव्हे, तर थेट तहसील कार्यालयाच्या आवारात घडल्याचा आरोप आहे.

**प्रशासनाच्या दारातच नागरिक असुरक्षित?**

शासकीय कार्यालये ही नागरिकांना न्याय, संरक्षण आणि प्रशासकीय मदत मिळण्याची केंद्रे मानली जातात. अशा ठिकाणीच एखाद्या नागरिकाला धमकावून मारहाण होत असेल, तर सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतात. निवेदन देण्यासाठी गेलेल्या व्यक्तीला लक्ष्य करून हल्ला करणे हे केवळ एका व्यक्तीवरचे आक्रमण नसून, न्याय मागण्याच्या मूलभूत अधिकारालाच आव्हान असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे.

**कायद्याचे राज्य की दहशतीचे?**

कायद्याच्या चौकटीत आपला प्रश्न मांडणाऱ्या शेतकऱ्याला ''परत इथे यायचं नाही'' अशा शब्दांत धमकावले जात असेल, तर हा प्रकार केवळ मारहाणीपुरता मर्यादित राहत नाही. नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्कांपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न म्हणूनही त्याकडे पाहिले जात आहे. महसूल प्रशासनाच्या दारातच अशा घटना घडत असतील, तर ग्रामीण भागातील सामान्य शेतकऱ्यांचा शासन व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**गुन्हा दाखल; पुढील तपास सुरू**

या प्रकरणी अमोल कारंडे यांच्या फिर्यादीवरून इंदापूर पोलिस ठाण्यात अमोल राऊत याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार सलमान खान करीत आहेत.

**जनतेचा सवाल**

''तहसील कार्यालयात निवेदन द्यायला गेलेल्या शेतकऱ्यालाच जर मारहाण होत असेल, तर सामान्य नागरिकांनी न्यायासाठी कोणाच्या दारात जावे?''

इंदापूर तालुक्यात सध्या हा प्रश्न सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. दोषींवर कठोर व निष्पक्ष कारवाई करून नागरिकांचा कायद्यावरील विश्वास कायम राखण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## गटकळ शाळेत योग दिवस उत्साहात साजरा

■ जनप्रवास : प्रतिनिधी



**टाकळीभान :** लेट श्री एकनाथ नामदेव गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये संस्थेचे जागतिक योगा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

अँड.भाऊसाहेब टेमक व अँड.सुरेखा टेमक यांच्या मार्गदर्शनाखाली योगा दिवस साजरा करण्यात आला. धावपळीच्या युगामध्ये शारीरिक तंदुरुस्ती खूप महत्त्वाची आहे शरीर मजबूत असेल तरच आपण चांगले जीवन जगू शकतो त्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जागृती व्हावी म्हणून आंतरराष्ट्रीय योग दिवस शाळेमध्ये साजरा करण्यात आला विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष योगासन सादर केली.

शाळेच्या प्राचार्या भारती कुदळे यांनी योगासनाचे महत्त्व सांगितले . कार्यक्रमाचे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य सुपरवायझर वर्षा मगर व माधुरी गटकळ तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विशेष परिश्रम घेतले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुतिका खवले यांनी केले व आभार पुनम वरपे यांनी मानले.

## लेखापरीक्षक, वित्तीय रिपोर्टिंग संस्थांनी परस्परपूरक काम करण्याची गरज : नितीन गुप्ता यांचे प्रतिपादन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** डिजिटल आणि अख च्या युगात लेखापरीक्षणाची जबाबदारी वाढली आहे. त्यामुळे लेखापरीक्षण प्रक्रियेतील गुणवत्ता आणि दर्जा टिकवण्या साठी राष्ट्रीय वित्तीय रिपोर्टिंग प्राधिकरण आणि भारतीय सनदी लेखाकार संस्थान (आयसीएआय) यांनी परस्परपूरक काम केले पाहिजे. त्यामुळे विकसित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्याची प्रक्रिया गतिमान होईल आणि देशातील वित्तीय अहवाल प्रणाली अधिक सक्षम होतील,'' असे प्रतिपादन राष्ट्रीय वित्तीय रिपोर्टिंग प्राधिकरण (एनएफआरआय) अध्यक्ष नितीन गुप्ता यांनी केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) व राष्ट्रीय वित्तीय रिपोर्टिंग प्राधिकरण यांच्या पुढाकाराने 'आयसीएआय'च्या सेंटर फॉर ऑडिट अँड क्वालिटी कमिटी आणि आयसीएआय पुणे शाखेच्या संयुक्त सहकार्याने आयोजित 'क्रिएटिंग अ बेटर फिनान्शियल रिपोर्टिंग इकोसिस्टीम' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी गुप्ता बोलत होते. यावेळी 'आयसीएआय'चे अध्यक्ष सीए प्रसन्नकुमार डी., उपाध्यक्ष सीए मंगेश किनारे व्यासपीठावर उपस्थित होते.

# 'एसआयआर'च्या प्रभावी अंमलबजावणीकरिता मतदारसंघ स्तरावर प्रशिक्षण सत्राचे आयोजन करा : जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम आजपासून जिल्ह्यात राबविण्यास सुरुवात झाली आहे; याअंतर्गत मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी मतदार संघनिहाय मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजन करण्यासह एसआयआरबाबत व्यापक स्वरूपात जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले. राजकीय पक्षांसोबत उत्तम समन्वय साधून त्यांचा प्रक्रियेत सहभाग वाढवावा, माध्यमांशी वेळोवेळी संवाद तसेच सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवत हा कार्यक्रम यशस्वी करावा, असेही ते म्हणाले.

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण सत्रात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा पिंपरी-चिंचवड मनपाचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त तुषार ठोंबरे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर,सर्व मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. डूडी यावेळी म्हणाले, पुणे जिल्ह्यात मतदार संख्या राज्यात सर्वाधिक आहे. एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये व अपात्र मतदार यादीत समाविष्ट होऊ नये या उद्देशाने हा मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या गणना पत्रकाची छपाई आणि त्याचे वितरण नियोजनपद्धतीने करावे. एसआयआर प्रक्रियेबाबत प्रशिक्षण सत्रे आयोजित करुन मतदान केंद्रस्तरीय अधिकारी अर्थात बीएलओंना प्रशिक्षण देण्यात यावे. मतदारांकडून गणना पत्रकात विचारलेली माहिती वेळेत भरली जाईल, याबाबत दक्षता घ्यावी. आवश्यक तिथे बीएलओंनी मतदारांना मार्गदर्शन करावे, असेही त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, या कार्यक्रमाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबत माहिती देण्यासाठी प्रत्येक बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात राजकीय पक्षांसोबत बैठक घेण्यात येणार आहे, त्याच प्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनीही मतदारसंघ निहाय राजकीय पक्षांच्या तालुकाप्रमुखांसोबत बैठकीचे आयोजन करावे. त्यांना मतदान केंद्र प्रतिनिधींची (बीएलए) नेमणूक करण्यास सांगावे. अद्यापपर्यंत 'अन मॅप' झालेल्या मतदारांची यादी त्यांना उपलब्ध करुन द्यावी. शहरी भागात गृह निर्माण संस्था आणि औद्योगिक आस्थापनासोबत बैठक आयोजित करुन प्रक्रिया पूर्ण करावी. तृतीयपंथीय, दिव्यांग, देह विक्री करणाऱ्या महिला, ८५ पेक्षा अधिक वयोवृद्ध मतदाराकरिता कार्यरत सामाजिक संघटनांची मदत घ्यावी. केलेल्या कामाची विविध माध्यमातून व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी, असेही श्री. डुडी यांनी सूचना दिल्या. यावेळी श्रीमती कळसकर यांनी एसआयआर प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली. उपस्थितांच्या शंकाचे निरसन करण्यात आले

# राहाता नगरपरिषदेस स्वच्छ महाराष्ट्र मिशन अंतर्गत जेटिंग ट्रकचे नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते लोकार्पण

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** राहाता शहराचे सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य अबाधित ठेवण्याचे दृष्टीने तसेच ड्रेनेज लाईन मध्ये गाळ अथवा घाण साचून पाणी तुंबल्याने होणारे नुकसान टाळण्यासाठी राहाता नगरपरिषदेस स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) २.० अंतर्गत प्राप्त झालेल्या ८५ लाख रुपये किमतीच्या सक्शन व जेटिंग ट्रकचे लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ स्वाधीन गाडेकर यांना वाहनाचीची चावी देऊन करण्यात आले.

यावेळी ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, राहाता शहराची सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य अबाधित ठेवणे खूप महत्त्वाचे असते त्यादृष्टीने शहरातील सांडपाणी वाहून नेणाऱ्या गटारी गाळमुक्त व साफ असणे गरजेचे आहे ड्रेनेज लाईन मधील गाळ काढता यावा कचरा व घाण मुक्त ड्रेनेज लाईन असावी याकरिता ८५ लाख रुपये किमतीचे अत्याधुनिक जर्मन टेक्नॉलॉजी ने बनवलेले वाहन८००० लिटर क्षमता १६ टन गाळ उपसा करण्याची क्षमता असलेले वाहन राहाता नगरपरिषदेस लोकार्पण केले आहे या वाहनाच्या माध्यमातून शहरातील भूमिगत गटारातील गाळ घाण कचरा चांगल्या पद्धतीने साफ केला जाईल त्यामुळे पावसाळ्यात अथवा इतर वेळी गटार तुंबणार नाही सुरळीत वाहतील त्यामुळे स्वच्छता ही टिकून राहील शहरातील नागरिकांचे आरोग्य व सार्वजनिक स्वच्छता खूप महत्त्वाची असून त्या स्वच्छते करिता लागणाऱ्या सोयी सुविधा व यांत्रिक सामग्री साधने कमी पडू देणार नाही पालिकेने शहरातील नागरिकांचे आरोग्याचे व स्वच्छतेच्या दृष्टीने प्रकल्प हाती घ्यावेत त्यास निधी देवु स्वच्छ सुंदर व हरित राहाता बनवावे जर्मन टेक्नॉलॉजीच्या वाहनाच्या साह्याने शहरातील गटारातील सगळी घाण व गाळ कचरा यांची सफाई करून



नागरिकांना व व्यापाऱ्यांना दिलासा द्या अशी सूचना यावेळी त्यांनी केली

लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ स्वाधीन गाडेकर म्हणाले की, शहरातील जनतेने नामदार डॉ राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ सुजय दादा विखे पाटील यांच्या नेतृत्वावर व कर्तुत्वावर विश्वास ठेऊन नगराध्यक्ष म्हणून मला आणि माझ्या समवेत सर्व नगरसेवकांना निवडून दिले. शहराचा विकास करण्याचा संकल्प मंत्री विखे पाटील यांनी घेतला आहे आम्ही निवडून आल्यापासून नामदार डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून अग्निशामक विभागाला फायर आणि रेस्क्यू वाहन, डॉ.सुजय विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे महिला भगिनींची तसेच शहराची सुरक्षितता जपण्यासाठी महाराष्ट्र सुरक्षा बल मिळाले. विखे पाटील परिवाराने राहाता शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी संकल्प केला असून त्या दृष्टीने भरीव निधी विकासाच्या नवनवीन योजना व प्रकल्प राहाता शहरासाठी आणले जात आहे पाच वर्षात राहाता शहराचा विकासात्मक काय पालट होऊन राज्याचे नकाशावर राहाता शहर विकासाचे रोल मॉडेल म्हणून उदयास येईल अशा पद्धतीने कामे सुरू आहेत शहरातील गटारी घाण कचरा व गाळाने तुंबून जात होत्या परिणामी पावसाळ्यात गटारी तुंबल्याने घरात अथवा दुकानांमध्ये पाणी शिरून मोठ्या प्रमाणात नुकसान होत असे मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांनी ८५ लाख रुपये किमतीची जर्मन टेक्नॉलॉजी ची सक्शन व जेटिंग वाहन दिल्याने ही समस्या मिटणार आहे नागरिकांना त्याचा मोठा दिलासा मिळणार आहे आठ हजार टन व १६ टन गाळ उपसण्याची क्षमता असलेली ही गाडी राहत्यातील गटार सफाई करिता वरदान ठरणार असून पावसाच्या पाण्यामुळे नागरिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी सुद्धा या गाडीचा मोठा फायदा होणार आहे . यावेळी उपनगराध्यक्ष डॉ विजय सदाफळ, गटनेते मुन्नाभाई शहा, माजी नगराध्यक्ष कैलास सदाफळ, नगरसेवक प्रवीण सदाफळ, अजय आग्रे राहुल सदाफळ, दशरथ तुपे संदीप मुर्तडक, अक्षय बोठे नगरसेविका सविता सदाफळ, शीतल बनकर माजी नगरसेवक भीमराज निकाळे, विजय गिधाड, सुरेश माळी प्रभाकर आरणे बाळासाहेब सदाफळ योगेश डांगे प्रदीप बनकर अरुण गाडेकर, वीरभद्र देवालय ट्रस्ट चे अध्यक्ष जबाजी मेचे, उपाध्यक्ष विजय सदाफळ बाळासाहेब सोनटक्के मनीष चितळकर आदी उपस्थित होते.

## अनुराधा उद्योग समूहाकडून विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप

### आढळगाव येथील पंडित नेहरू विद्यालयात सामाजिक बांधिलकीचा उपक्रम; शिक्षणातून प्रगती करण्याचे आवाहन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील आढळगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयातील इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना अनुराधा उद्योग समूहाच्या वतीने मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक मदत मिळावी आणि त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ मिळावे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



आढळगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयातील विद्यार्थ्यांना अनुराधा उद्योग समूहाच्या वतीने मोफत शालेय साहित्याचे वितरण करताना मान्यवर.

अनुराधा उद्योग समूह गेल्या अनेक वर्षांपासून तालुक्यातील विविध शाळांमध्ये शालेय साहित्याचे वितरण करून सामाजिक बांधिलकी जपत आहे. या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध होत असून शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होत आहे.

कार्यक्रमाच्या प्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल ठवाळ यांनी आपल्या संघर्षमय शालेय जीवनाच्या आठवणींना उजाळा देत गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदतीचा हात देण्याच्या उद्देशातून हा उपक्रम सुरू केल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी परिस्थितीची पर्वा न करता शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे भविष्य घडवावे, असे आवाहन त्यांनी केले.

अनुराधा उद्योग समूहाचे संचालक श्रीकांत ठवाळ यांनी १९९५ पासून सुरू असलेल्या या उपक्रमाची माहिती देताना विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन शिक्षणात प्रगती साधावी, असे मत व्यक्त केले. शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन असून विद्यार्थ्यांनी ज्ञानाच्या बळावर यश संपादन करावे, असेही त्यांनी नमूद केले.

उपसरपंच सौ. अनुराधा ठवाळ यांनी गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी योगदान देण्यात मिळणारे समाधान व्यक्त करत अशा सामाजिक उपक्रमांना सातत्याने पाठबळ देण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी सौ. अनुराधा अनिल ठवाळ (उपसरपंच, ग्रामपंचायत आढळगाव) तसेच अनिल ठवाळ (माजी जिल्हा परिषद सदस्य) यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीकांत ठवाळ तर सूत्रसंचालन बापू काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विद्यालयाचे प्राचार्य विक्रम घालमे यांनी मानले. विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## पंचायत समिती कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पगार मिळेना : पालकमंत्री विखेंना निवेदन



■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** पंचायत समिती तसेच जिल्हा परिषद पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कंत्राटी कर्मचारी यांचा मागील सहा महिन्यांचा पगार थकित असून पगार तात्काळ करावा या मागणीसाठी पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांना गट संसाधन कर्मचारी संघटनेकडून निवेदन देण्यात आले आहे .

डिसेंबर २०२५ ते मे २०२६ या कालावधीतील सहा महिन्याचा पगार शासनाकडून करण्यात आलेला नाही, या विभागातील कर्मचारी हे पाणी पुरवठा, स्वच्छ भारत मिशन तसेच जलजीवन मिशन या मोठ्या स्वरूपाची कामे पाहतात परंतु पगार होत नसल्यामुळे कर्मचाऱ्यापदी अनावस्था येत आहे . पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे यांना ही बाब कर्मचारी यांनी सविस्तर सांगितली असून कार्यवाहीचे आश्वासन कर्मचारी यांना देण्यात आले आहे. निवेदन देण्यासाठी यावेळी राज्य गट संसाधन समीतिचे अध्यक्ष यशोदास खरात, राहाता अध्यक्ष भारत बनसोडे, सागर कुऱ्हे , लहानु बेल्हेकर, संदीप हिंगे, सागर आहेर, अरुण थोरात, निलेश ब्राह्मणे, योगेश पारखे, सचिन बोरुडे, अशोक कडलक तसेच किरण बारहाते आदी कर्मचारी उपस्थित होते.

## पोलीस ठाण्यात धिंगाणा घालणाऱ्यावर गुन्हा; ठेगे यांच्या कार्यकाळात कायद्याचा बडगा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या आवारात मद्यधुंद अवस्थेत आरडाओरडा करून धिंगाणा घालणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध श्रीगोंदा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणाऱ्या आणि कायदा–सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाईची मोहीम सुरू असून, त्याचाच एक भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली.

शनिवार (दि. २० जून २०२६) रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या आवारात एक इसम आरडाओरडा करत असल्याची आढळून आल्यावर पोलिसांनी त्याच्याकडे चौकशी केली असता त्याच्या तोंडातून मद्याचा उग्र वास येत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी संबंधित व्यक्ती मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत असल्याचा अहवाल दिला.

या अहवालाच्या आधारे श्रीगोंदा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ८५(१) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११० व ११७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल अविनाश काटकर करीत आहेत.




दरम्यान, मागील काही वर्षांपासून काही व्यक्तींकडून पोलीस ठाणे परिसर, बसस्थानक, शनी चौक, बाजारतळ आदी सार्वजनिक ठिकाणी बसून गोंधळ घालणे, शिवीगाळ करणे तसेच पोलीस ठाण्यात येऊनही गैरवर्तन करण्याच्या घटना घडत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होती. याबाबत काही सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलिसांकडे तक्रारी व निवेदनेही दिली होती. मात्र अपेक्षित कारवाई होत नसल्याची भावना व्यक्त केली जात होती.

मात्र पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अशा प्रवृत्तींवर आळा घालण्यासाठी विशेष लक्ष दिले जात आहे. सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन गोंधळ घालणारे, शिवीगाळ करणारे तसेच कायदा–सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येत असल्याने अशा व्यक्तींचा वावर लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

"कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांची कारवाई यापुढेही सुरू राहणार आहे," असा संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.

## संत निरंकारी मिशनचा आंतरराष्ट्रीय योग दिवस

■ जनप्रवास प्रतिनिधी

**भोसरी (पुणे) :** 'निरोगी शरीर, निर्मळ मन आणि सजग आत्मा' या पवित्र संकल्पाला प्रत्यक्षात साकार करत संत निरंकारी मिशन आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने एक व्यापक योग व आध्यात्मिक चेतना अभियान आयोजित करत आहे. सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पावन आशीर्वाद आणि दूरदर्शी मार्गदर्शनाखाली राबवले जाणारे हे प्रेरणादायी अभियान मानवकल्याण, समग्र आरोग्य आणि आत्मिक उन्नतीच्या दिशेने एक अर्थपूर्ण पाऊल आहे.

सतगुरु माता जींचा प्रेरक संदेश – स्वस्थ मन, सहज जीवन या सत्याला अधोरेखित करतो की जीवनाची खरी समृद्धी केवळ शारीरिक स्वास्थ्य नसून मानसिक संतुलन आणि आध्यात्मिक जागरूकतेत आहे. सतगुरु माता जींनी आपल्या प्रवचनामध्ये अनेकदा उल्लेख केला आहे कि मानवी शरीर ही परमात्म्याची अनुपम देणगी आहे, ज्याची देखभाल आणि सुदृढता व्यक्तीला आपल्या आध्यात्मिक, सामाजिक आणि मानवी जबाबदाऱ्या अधिक उत्तम प्रकारे पार पाडण्यास सक्षम बनवते. हे अभियान योगाला केवळ शारीरिक व्यायाम न मानता आत्मबोध, अंतर्गत शांतता, मानवीय एकता आणि विश्वबंधुत्वाची भावना विकसित करणारी एक समग्र जीवनसाधना म्हणून स्वीकारण्याचा संदेश देते.

याच प्रेरणादायी भावनेनुसार जागतिक योग्य दिनाच्या निमित्ताने संत निरंकारी मिशनतर्फे रविवार, २१ जून २०२६ रोजी सकाळी ६:०० वाजता पुणे जिल्ह्यातील मिशनच्या सत्संग भवन भोसरी ,पिंपरी ,रुपीनगर सह भारतभरातील १५०० हून अधिक केंद्रांवर एकाच वेळी योग शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. मिशनच्या विविध शाखांमध्ये स्थानिक योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मोकळ्या मैदानांमध्ये आणि उद्यानांमध्ये होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये श्रद्धाळू, सेवादल स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिक उत्साहाने सहभागी होतील.

## कान्हेगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी काळे गटाचे अमोल वाळूंज यांची बिनविरोध निवड

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील कान्हेगाव ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच दिपक चौधरी यांनी रोटेशननुसार आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या उपसरपंचपदी काळे गटाचे अमोल विठ्ठलराव वाळूंज यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.



कान्हेगाव ग्रामपंचायतीच्या रिक्त असलेल्या उपसरपंच पदासाठीची निवडणूक प्रक्रिया नुकतीच सरपंच गणेश सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपसरपंचपदासाठी निर्धारित वेळेत अमोल वाळूंज यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहत असलेले ग्रामसेवक प्रकाश जाधव यांनी अमोल वाळूंज यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

यावेळी सरपंच, सर्व सदस्य व काळे गटाच्या कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित उपसरपंच अमोल वाळूंज यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी सरपंच गणेश सोनवणे, मावळते उपसरपंच दिपक चौधरी, ग्रा.प.सदस्य संध्या सांगळे, चित्र भाकरे, मालन मगर, जयश्री बाळासाहेब पवार, नंदकुमार आव्हाड, प्रदीप हिवराठे, विशाल पांडव, बबन सांगळे, लक्ष्मण चौधरी, देवचंद कढेकर, दत्तात्रय वाळुंज, संतोष वाळुंज, संदीप वाळुंज, बबन वाळुंज, शरद सांगळे, दत्तात्रय मगर, प्रभाकर भाकरे, अशोक काजळे, संदिप काजळे, गणेश करडे, प्रसाद चौधरी, रमेश काळे, सागर शिंदे, योगेश जगताप, सचिन चौधरी, अक्षय भाकरे, संकेत भाकरे, शुभम चौधरी, माधव चौधरी, मनोज काजळे, किरण वाळूंज, बाबासाहेब काजळे, संदीप भाकरे, डॉ. लहिरे, डॉ. काळे, रमेश सोळसे, सुनील काजळे, अनिल काजळे आदी मान्यवरांसह काळे गटाचे कार्यकर्ते व कान्हेगावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांनी बाजार भरवून केला कोल्हे गटाच्या निष्क्रीयतेचा निषेध

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**कोपरगाव :** तालुक्यातील मोर्विस येथील उपबाजार समितीत आज शेतक–यांनी चक्क प्रतिकात्मक बाजार भरवीला. सत्ताधारी कोल्हे गटाच्या निष्क्रियतेकडे लक्ष वेधण्यासाठी हा बाजार भरविण्यात आला. येथे शेतमालाचे लिलाव आजवर का सुरू केले नाही असा प्रश्न शेतकरी विचारीत होते. आता आमदार आशुतोष काळे यांनी लक्ष घालून येथील बाजार सुरू करावा असे साकडे शेतक–यांनी घातले.



हा प्रतिकात्मक बाजार परिसरात चर्चेचा विषय ठरला. मोर्विस बरोबरच सांगवी भुसार, धामोरी, मायगाव देवी, मोर्विस, चास नळी, वडगाव, बक्तरपूर,मंजूर, हंडेवाडी, कारवाडी, वेळापूर आदी गावातील शेतकरी या आगळ्या वेगळ्या आंदोलनात सहभाग घेतला.

शेतक–यांनी या ठिकाणी सत्यनारायण पुजा केली. कांद्याचे लिलाव करून उत्पादकांना प्रतिकात्मक टोकण देखील दिले. सभापती साहेबराव रोहोम व कोल्हे यांचा निषेध केला. उप बाजारासाठी भाडे तत्वावर जागा घेऊन सव्वा वर्षे लोटले. तरीही मोर्विस येथील उपबाजार समितीत सत्ताधारी कोल्हे गटाने अद्यापही शेतमालाचे लिलाव सुरू केले नाहीत. जागेच्या भाड्याचे पैसे वाया गेले. शिवाय या परिसरातील शेतकऱ्यांना शेतमाल विकण्यास अडचण निर्माण झाली. त्यांना सध्या विस किलोमिटर अंतरावरील कोपरगाव बाजार समितीत येऊन शेतमाला विकावा लागतो. या उपबाजार समितीची अवस्था असून अडचण नसून खोळंबा अशी झाली. वेळेत लिलाव सुरू झाले असते तर परिसरातील गावांना फायदा आणि रोजगार निर्मीती झाली असती. त्यामुळे आजच्या आंदोलनात सहभागी झालेल्या शेतक–यांनी कोल्हे गटाचे सभापती साहेबराव रोहोम व त्यांना मार्गदर्शन करणा–यांचा निषेध केला.

# आमवातावर करा आता प्रभावी आयुर्वेद उपचार

आमवात!सर्वसाधारण व्यक्तीला आपण सहजच बोलताना बघतो की मला वाताचा त्रास आहे, माझे सांधे वातामुळे जखडले गेलेत आदी. मग हा वात आणि आमवात एकच का? की हे वेगवेगळे आहेत? यांची लक्षणे काय? यावर यशस्वी चिकित्सा आयुर्वेदात आहे का? आमवात इतर वातव्याधींपेक्षा वेगळा कसा ओळखावा? यापासून पूर्ण सुटका मिळू शकते का? असे एक न अनेक प्रश्न घेऊनच रुग्ण आम्हा आयुर्वेद चिकित्सकांकडे येत असतो. आमवात हा कष्टसाध्य व्याधींपैकी एक आहे. अतिशय कष्टपूर्वक, मेहनतीने, नियमित चिकित्सा देऊन रुग्णाने कायमस्वरूपी पथ्य पाळूनच यात यश मिळणार आहे. प्रथमत: अतिशय आशेने आलेल्या रुग्णाला हे कटू सत्य पचनी पडणे तेवढेच जिकिरीचे असते. त्यामुळेच आमवाताने पीडित व्यक्ती, व्याधिग्रस्त रुग्णांच्या कुटुंबीयांनी खचून न जाता मध्येच चिकित्सा सोडून देऊ नये. अतिशय सकारात्मक जीवनशैली आत्मसात करून या व्याधीचा मुकाबला करावा.

आमवात तसा म्हटला तर वातव्याधीचाच भाऊबंद. फरक एवढाच की या व्याधीची भाऊबंदकी जरा जास्तच घट्ट असते. जसे की या व्याधीच्या नावातच आपणास दोन शब्द जाणवतात. १- आम, २-वात.

१) आम - म्हणजे अपक्व आहार रस

२) वात - शरीरात प्रकोपित झालेला वातदोष

आपण सेवन केलेल्या आहारावर जठराग्नीची प्रक्रिया होऊन प्राकृत आहाररस तयार होतो. काही कारणास्तव जसे की अग्निमांद्य निर्माण झाले असता हा तयार होणारा आहाररस पक्व स्वरूपात तयार न होता अपक्व स्वरूपात तयार होतो व आमनिर्मिती होते.



याच्याच सोबतीने वातप्रकोपक आहार-विहाराच्या सेवनाने प्रकोपित झालेला वातदोष या अपक्व आहार रसास (आमास) शरीरातील विविध सांध्यांच्या ठिकाणी नेऊन आश्रयित होतो. आमवात व्याधीची निर्मिती होते.

आमवाताची कारणे

*अग्निमांद्य (पचनशक्ती मंदावणे)

*विरुद्ध आहार-विहाराचे सेवन

*अभिष्यंदी (दोषप्रकोपक) आहाराचे सेवन. उदा. दही, आंबवलेले पदार्थ इत्यादी

*दीर्घकाळपर्यंत शिळ्या पदार्थांचे सेवन

*अति लंघन (अति उपवास) करणे

*मलमूत्रादी अधारणीय वेगांचे धारण करणे

*रात्री अति प्रमाणात जागरण (रात्रपाळी करणा-या व्यक्ती)

*वातप्रकोपक आहारविहार

*दिवास्वाप (दिवसा झोपणे)

*व्यायामाचा पूर्णत: अभाव

ही आमवाताची प्रमुख कारणे आहेत.

आमवाताची लक्षणे

*संधिशूल (सांध्यांच्या ठिकाणी वेदना)

*वेदनांचे स्वरूप हे वृश्चिक दंशवत (विंचू चावल्याप्रमाणे) असते.

*संधिशोध (सांध्यांच्या ठिकाणी सूज)

*सांध्यांच्या ठिकाणी उष्ण स्पर्श जाणवणे.

*सांध्यांच्या ठिकाणी आरक्त वर्णता (लालसरपणा)

*प्रात:काळी विशेषत: शीतऋतूत पर्वसंधी प्रदेशी वक्रता. (हातपायाची बोटे वाकणे)

*संचारी शूल व संचारी वेदना हे वैशिष्ट्यपूर्ण लक्षण आहे. अर्थात एकाच वेळेला विविध सांध्यांमध्ये वेदनांचा संचार होत असतो. ज्वर प्रचिती (ताप जाणवणे)

*सांध्यांच्या ठिकाणी क्रियाशूल, क्रियाकल्पता, क्रियाहीन होणे.

*जीर्णावस्थेत उपद्रव स्वरूपात हृद्रोग होण्याची दाट शक्यता असते.

आमवाताची चिकित्सा

व्याधिबल, रुग्णबल, व्याधीची प्रकृती, रुग्णाची प्रकृती, व्याधी अवस्था, देश, रुग्णाची सात्म्य-असात्म्यता इत्यादी या गोष्टींचा विचार करूनच चिकित्सा होते.

दोष प्राधान्यानुरूप, रुग्णबल बघून, वमन-विरेचनादी पंचकर्माद्वारे शरीरशुद्धी केली जाते.

विविध औषधी कल्पांची अतिशय कल्पकतेने योजना करून रुग्णाच्या शरीरातील वाढलेल्या दोषांना साम्यावस्थेत आणले जाते.

पथ्यापथ्याची जोड देऊन चिकित्सा पूर्ण होते.

जीवनशैलीत योग्य ते बदल घडवून, दिनचर्या, ऋतुचर्या यांचे पालन करून तसेच पथ्यापथ्यावर योग्य नियंत्रण ठेवून,आपण निश्चितच आमवात या कष्टसाध्य व्याधीवर नियंत्रण मिळवू शकतो. या सर्वांच्या सोबतीला आवश्यक असते ती खंबीर पाठिंब्याची, केवळ रुग्णाचीच नव्हे तर रुग्णाच्या नातेवाइकांचीसुद्धा!

# हातावरील ही रेषा सांगते स्त्री-पुरुष प्रेम-प्रसंग आणि लग्नासंबंधीच्या खास गोष्टी

हस्तरेषा ज्यीतीष्य-शास्त्रानुसार सर्व लोकांच्या हातावर लग्न किंवा प्रणय रेषा असते. काही लोकांच्या हातावर एकापेक्षा अधिक प्रणय रेषा असतात. ही रेषा सांगते की, मनुष्याचे लग्न केव्हा होणार? का होणार नाही, वैवाहिक जीवन कसे राहील? लग्न व प्रेम प्रकरणाशी संबंधित सर्व प्रश्नांचे उत्तर या रेषेचा अभ्यास करून मिळू शकतात.

आपल्या हातावरील छोट्या छोट्या रेषांमध्ये सतत काहीतरी बदल होत असतात.परंतू काही विशिष्ट रेषांमध्ये काहीच परिवर्तन होत नाही. यामध्ये जीवन रेषा, भाग्य रेषा, हृदय रेषा, मणिबंध, सूर्य रेषा आणि विवाह रेषा यांचा सामावेश आहे.


हातावर या ठिकाणी पाहा प्रणय रेषा

कुठे असते विवाह रेषा - विवाह रेषा लिटिल फिंगर (करंगळी) च्या खालच्या बाजूला असते. काही लोकांच्या हातावर एक विवाह रेषा असते तर, काहींच्या हातावर एकापेक्षा जास्त. करंगळीच्या खाली असलेल्या भागाला बुध पर्वत असे म्हणतात. तेथे असलेल्या रेषांना विवाह रेषा म्हणतात.

विवाह रेषेवरून तुमचे वैवाहिक आयुष्य कशा प्रकारचे असेल हे सांगता येते. जर ही रेषा खालच्या बाजूला जात असेल तर दांम्पत्य जीवनात ब-याच अडचणींचा सामना करावा लागण्याची शक्यता असते.

बुध पर्वताकडून येणारी एखादी रेषा विवाह रेषेला छेद करत असेल तर, त्या व्यक्तीचे वैवाहिक आयुष्य अडचणींचे ठरू शकते. हातावर असलेल्या विवाह रेषांच्या संख्येनुसार व्यक्तीच्या आयुष्यात किती प्रेम प्रसंग घडू शकतात हे समजते. जर ही रेषा अर्धवट तुटलेली असेल तर त्या व्यक्तीचा विवाह तुटण्याची शक्यता असते. जर विवाह रेषा रिंग फिंगर (अनामिका) खाली असलेल्या सूर्य रेषेपर्यंत गेली असेल तर, त्या व्यक्तीचा विवाह एखाद्या विशिष्ट व्यक्तीशी होण्याचा संभव असतो.

विवाह रेषा आणि दोन्ही हातांवरील असलेल्या सर्व रेषांचा अभ्यास करूनच योग्य भविष्यवाणी केली जाऊ शकते.

# प्रेयसीला असे खुश ठेवा

प्रेयसीच्या चेहऱ्यावर हास्य पाहू इच्छित असाल तर खाली दिलेल्या टिप्सचे पालन करा. त्यामुळे तुमची प्रेयसी आनंदीत होईलच शिवाय तिला आनंदी पाहून तुमचाही आनंद द्विगुणित होईल.



* तिच्या सौंदर्याची स्तुती करा.

* काही सेकंदांसाठी तिचा हात हातात घ्या.

* प्रेमळ चुंबन द्या.

* झोपेतून उठविण्यासाठी तिच्याच आवाजातली रेकॉर्ड केलेला आवाज ऐकवा.

* तुम्ही तिच्यावर प्रेम करता याची तिला वेळोवेळी जाणीव द्या.

* जर ती नाराज असेल तर तिला बाहूपाशात घेऊन ती तुमच्यासाठी किती महत्त्वाची आहे याची तिला जाणीव द्या.

* तिच्या छोट्या-छोट्या गोष्टीही लक्षात ठेवा. कारण प्रेमात हाही महत्त्वाचा भाग आहे.

* कधी कधी तिच्या आवडीची गाणे तिलाच ऐकवा. (तुमचा आवाज कितीही खराब असला तरी)

* तिच्या मित्र-मैत्रिणींसोबतही काही वेळ घालवा.

* आपल्या कुटुंबातील व्यक्ती, आपले मित्र यांच्याशीही तिची ओळख करून द्या. यामुळे तिचा तुमच्यावरील विश्वास वाढेल.

* कधी-कधी तिच्यासोबत थोडी मस्तीही करा. (गुदगुल्या करणे, बाहूपाशात घेणे आदी)

* तिच्या केसांमधून तुमचा हात फिरवा. यामुळे तिला तुमच्या प्रेमाची जाणीव होईल.

* हसविण्यासाठी काही जोक्स ऐकवा.

* ध्र्या रात्री तिच्या खिडकीजवळ एक छोटा दगड फेका आणि तिला सांगा की तुम्हाला तिची किती आठवण येते.

* तिच्याशी एकांतात वागता तसेच मित्रांसमोरही वागा. * तिच्यावरील प्रेम नेहमी तिच्यासमोर व्यक्त करीत जा.

■■■

# स्त्री असो वा पुरुष, जाणून घ्या सकाळी अंथरुन सोडण्यापूर्वी काय पाहावे

आपण आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांमागची इडापीडा दूर होऊन घरात भरभराटी यावी, अशी प्रत्येकाची इच्छा असते. मनातील इच्छा पूर्ण होण्यासाठी ज्योतिषशास्त्रात अनेक उपाय सांगितले आहेत.

तुमच्या दिवसाची सुरुवात जर चांगली होत असेल तर तुमचा संपूर्ण दिवस मजेशीर जातो. परंतु सकाळी झोपेतून जागी झाल्यानंतर जर आपल्या नजरेच विचित्र वस्तू पडत असेल तर त्याचा विपरित प्रभाव आपल्या संपूर्ण दिवसावर होत असतो. त्यामुळे दिवसाची सुरुवात चांगली होण्यासाठी आपण झोपेतून उठल्यानंतर आणि अंथरून सोडण्यापूर्वी काय पाहिले पाहिजे, हे जाणून घेण्यासाठी...

आजचा दिवस कसा जाईल? असा प्रश्न प्रत्येकालाच सकाळी झोपेतून उठल्यानंतर पडत असतो. दिवस चांगला जावा म्हणून बहुतेक जण सकाळी पुजा-पाठलोग करत असतात. आपला दिवस बिना कटकटीचा जावा, अशी प्रत्येकाची इच्छा असते. सकाळी झोपेतून उठल्यानंतर आपल्या तळहातांचे दर्शन घेतले पाहिजे, असा महत्त्वपूर्ण उपाय ज्योतिषशास्त्रात सांगितला आहे.

सकाळी झोपेतून उठल्यानंतर काही लोक देवाचे दर्शन घेतात तर काही आपल्या घरातील प्रिय सदस्याचे मुख दर्शन घेतात. परंतु अंथरून जोडण्यापूर्वी स्त्री असो अथवा पुरुषांनी आपल्या तळहाताचे दर्शन घेतले पाहिजे.तळहाताचे दर्शन घेतल्याने काय होते? असा जर तुमचा प्रश्न असेल तर त्याचे उत्तर धर्मग्रंथात दिलेल्या मंत्रात लपले आहे.-

कराग्रे वसति लक्ष्मी: करमध्ये सरस्वती।


करमूले तू गोविंद: प्रभाते करदर्शनम्।।

या मंत्रात सांगितले आहे की, तळहाताच्या अग्रभागी महालक्ष्मीचा वास असतो. हाताच्या मध्यभागी सरस्वती तर हाताच्या मुळभागात भगवान विष्णु यांचा वास असतो. अत: प्रात:काळी दोन्ही तळहातांचे दर्शन घेतले पाहिजे.

तळहाताचे दर्शन घेतल्याने काय होते? असा जर तुमचा प्रश्न असेल तर त्याचे उत्तर धर्मग्रंथात दिलेल्या मंत्रात लपले आहे.-

कराग्रे वसति लक्ष्मी: करमध्ये सरस्वती।

करमूले तू गोविंद: प्रभाते करदर्शनम्।।

या मंत्रात सांगितले आहे की, तळहाताच्या अग्रभागी महालक्ष्मीचा वास असतो. हाताच्या मध्यभागी सरस्वती तर हाताच्या मुळभागात भगवान विष्णु यांचा वास असतो. अत: प्रात:काळी दोन्ही तळहातांचे दर्शन घेतले पाहिजे.

तळहातांचे दर्शन घेताना 'कराग्रे वसति लक्ष्मी: करमध्ये सरस्वती। करमूले तू गोविंद: प्रभाते करदर्शनम्।।' या मंत्राचा जप करावा. त्यानंतर दोन्ही हात आपल्या चेहऱ्यावरून फिरवून घ्यावे. हा उपाय फार चमत्कारिक आहे. प्राचीन ऋषि-मुनीच्या मते, आपल्या तळहातांवर दैवीशक्ती वास करत असते. त्यामुळे दिवसभर ती आपल्याला ऊर्जा प्राप्त होत असते. सकाळी तळहाताचे दर्शन घेण्यामागे असा संदेश आहे की, आपण परमेश्वराकडे अशी कामना करतो की माझा आजचा दिवस सुखी आणि समृद्ध जाऊ दे.

सकाळी आपल्या तळहाताचे दर्शन घेतल्याने आपल्याला तीन दिव्य शक्तिंच्या दर्शनाचे पुण्य प्राप्त होत असते.

## पत्नीला खुश ठेवण्यासाठी कपडे धुवा!

पाश्चाच्य देशांमध्ये कसले कसले सर्व्हे होतात देव जाणे. आता ब्रिटनमध्ये केलेल्या एका पाहणीत, असे दिसून आले आहे की, आपल्या जोडीदाराला खूश ठेवण्यासाठी तिला महागडे गिफ्ट देण्याची आवश्यकता नाही, त्याऐवजी घरातील कपडे धुतले तरी ती खूश होऊ शकते.

थोडक्यात घरकामाला जर नवरा काही हातभार लावत असेल तर ती महिलांसाठी आनंददायीच गोष्ट असते.

# मालामाल होण्याचे हे उपाय एकदा नक्की करुन पाहा

भारतीय समाज पुरातन काळापासून दैवी यंत्राचा उपयोग करीत आहे. आपले पूर्वज या दैवी यंत्राच्या शक्तीला चांगल्याप्रकारे ओळखून होते, त्यामुळे त्यांनी या ज्ञानाचा प्रसार वाढवला. आजही यंत्राच्या माध्यमातून कोणतेही कठीण कार्य सहजतेने पूर्ण करता यते. यंत्राला साक्षात देवाचे रूप मानले जाते. तुम्हाला अपार धनाची इच्छा असले तर यंत्र साधना हे सोपे माध्यम आहे.

श्रीयंत्र - यंत्र शास्त्रात श्रीयंत्राची विशेष महिमा सांगितली आहे. या यंत्राचा धन प्राप्ती, धन वृद्धी, कर्ज प्रकरणातून धन मिळवण्यासाठी, बँकेतून कर्ज मिळण्यासाठी तसेच लॉटरी, सट्टा या गोष्टीतून धन प्राप्तीसाठी उपयोग केला



जातो.

महालक्ष्मी यंत्र - या यंत्राला निरंतर धन वृद्धीसाठी उपयोगी मानले जाते. कमी वेळात जास्त धन प्राप्तीसाठी हे यंत्र अत्यंत उपयोगी आहे. या यंत्राच्या कृपेने गरीब व्यक्तीसुद्धा अचानक श्रीमंत होतो. या यंत्राच्या प्रभावाने दरिद्रता नष्ट होते.

कुबेर यंत्र - जर तुम्हालाही असे वाटत असेल की, तुमच्याजवळ भरपूर धन-संपत्ती असावी. जगातील सर्व सुख-सुविधा असव्यात. कधीही कोणत्याही गोष्टीची कमतरता भासू नये, तर मग चमत्कारिक कुबेर यंत्राची पूजा करा.

स्वर्ण लाभ, रत्न लाभ, गुप्तधन किंवा पूर्वजांच्या धनाचा लाभ घेण्यासाठी कुबेर यंत्र अत्यंत उपयुक्त आहे. या यंत्राच्या प्रभावाने विविध मार्गातून धन पाप्त होते. तसेच पैशाची बचतही होते. शिवपुराणानुसार यक्षराज कुबेर अलकावती नगरीचे राजा होते.


मंत्र

ऊँ यक्षाय कुबेराय वैश्रवणाय धन्य धन्याधिपतये धन धान्य समृद्धि में देहित दापय स्वाहा ।

शुक्र यंत्र - ज्योतिष्यशास्त्रानुसार शुक्र ग्रहामुळे जीवनात धन, वैभव,ऐश्वर्य व इतर सुविधांची प्राप्ती होते. शुक्र ग्रहाला प्रतिकूल करण्यासाठी ज्योतिष्यशास्त्रात विविध उपाय सांगण्यात आले आहेत, परंतु शुक्राची यंत्र स्वरुपात स्थापना करून त्या यंत्राची विधिवत रोज पूजा केल्यास साधक लवकर मालामाल होऊ शकतो.

मंगल यंत्र - ज्योतिष्यशास्त्रानुसार मंगळ भूमी कारक ग्रह आहे. जर एखाद्या व्यक्तीला स्थावर मालमत्ता, जमीन, दुकान किंवा घरासंबंधी काही अडचण असेल, तर मंगल यंत्राची नियमित पूजा केल्यास सर्व अडचणी दूर होतील.

# गांधर्व विवाहाविषयी थोडसं...



शास्त्रानुसार मनुष्य जिवनाचे सोळा प्रमुख संस्कार सांगितले आहेत.त्यातील सग़ळ्यात महत्वाचा संस्कार म्हणजे विवाह. तसे विवाहांचे आठ प्रकार सांगितले गेले आहेत त्यातील चार विवाहांना श्रेष्ठ मानले गेले आहे. ते असे देव विवाह, ब्रह्म विवाह, आणु विवाह, आणि प्राजन्य विवाह. सगळ्या विवाहांची वेगवेगळी पध्दती आहेत. अनैतिक विवाहांचे प्रकार गांधर्व विवाह, राक्षस विवाह, असुर विवाह आणि पिशाच विवाह यातील गांधर्व विवाह हा सगळ्यात चर्चेचा विवाह आहे. गांधर्व विवाह कशाला म्हणतात? या संबंधी वेद व्यासांद्वरे रचलेली एक कथेत महाभारतातील एक प्रसंग सांगितला आहे.

हा प्रसंग राजा दुष्यंत आणि शकुंतला यांच्यातील आहे. त्यावेळी राजा दुष्यंत भारताच राजे होते. एकदा शिकारीला गेले असता ते वनात ऋषि कण्वांच्या आश्रमात पोचतात तर तिथे शकुंतला नावाची कन्या होती तिला कण्व ऋषिंनी मुलगी मानलं होते. तिचे सौदर्य पाहून राजा तिच्या मोहात पडले आणि लगेच त्यांनी तिच्याशी विवाह करण्याची मागणी केली. शकुंतलाने देखील राजाच्या मागणीला होकार दिला. यानंतर राजाने आणि शकुंतलाने रिती-रिवाजा शिवाय गांधर्व विवाह कला त्यानंतर तिने भरत नावाच्या मुलाला जन्म दिला जो पुढे जाउन भारताचा राजा झाला.त्याच्याच नावावरून आपल्या देशाचे नाव भारत ठेवले गेले.

## हास्य विनोद

■ एक माणूस रागारागाने फोटोग्राफरकडे गेला आणि म्हणाला, 'हा तुम्ही काढलेला फोटो मला मुळीच आवडला नाही. यात मी चक्क माकड दिसतोय.'

'याचा विचार आपण फोटो काढण्यापूर्वी करायला हवा होता.

■ संताच्या मुलाची गाडी पंक्चर झाली. बाजूच्या शेतातील शेतकऱ्याने त्याला बोलाविले, म्हणाला, आधी दोन घास खा मग गाडी सरळ करु. खाता खाता संताचा मुलगा सारखे म्हणत होता की बाबा चिडतील. जेवण केल्यावर शेतकऱ्याने विचारले, तुझे वडिल आहेत तरी कुठे ? मुलाने उत्तर दिले गाडीच्या खाली..!

# संसारा अगोदरचं आणि संसारानंतरचं प्रेम...



जर का आपण प्रेमाच्या प्रवाहात वाहत गेलो आणि आंतरीकप्रेम करु लागलो त्यातून जे काही घडतं ते स्वीकारणारं मन आपल्याकडे नसतं. एकमेकांच्या प्रेमात वाहून जाणं गरजेचं असतं. मात्र, स्वाभीमान आणि तोही खोटा बाळगण्यापेक्षा प्रेमसंबंधात अधिक गोडवा निर्माण कसा होईल याला महत्व दिले पाहिजे. यामुळे मनाला कधीकधी समजवावं लागतं आणि दु:ख,यातना पचवण्याचं बळ देखील द्यावं लागतं. हे जर केल तरच खरं आयुष्य कळतं. आयुष्यात संसारा अगोदरचं प्रेम आणि संसारानंतरच प्रेम भरपूर काही शिकवून जातं. आयुष्याच्या सुरुवातीला कोणी-कोणासाठी झुरत असतं, मरत असतं आंतरातलं प्रेम कुणासमोर उघड करत नसतं. तर कुणी ते बिनबोभाट करत असतं. तर कुणी मी प्रेम करतो, ती प्रेम करते हे दर्शविण्यासाठी धडपडत असतं. मात्र, आयुष्य जगताना प्रेम कितपत उपयोगी पडतं याकडेही लक्ष देणं तितकंच गरजेचं असतं. विनायक- मनिषाच्या लग्नाला दोनच वर्षे झाली आहेत, पण विनायकाला आत्ताच आपल्या संबंधात शिळेपणा वाटू लागला आहे. कालपर्यंत ज्या गोष्टी त्याला आकर्षित करीत होत्या, त्याच त्याला आज निराश व्हायला भाग पाडत आहेत. पूर्वी त्याला मनिषाचा सहवास हवाहवासा वाटत असे; पण हल्ली तो काही काळ घराबाहेर राहणेच पसंत करीत आहे. ही समस्या खरं तर फक्त विनायक मनिषाचीच नाही तर सर्वच विवाहित जोडप्यांना अनुभवावी लागते. एवढेचनव्हे तर अविवाहित वा प्रेम करणाऱ्या जोड्यांमध्येही काही काळानंतर ही समस्या येते. प्रेमातील या अनाकर्षणाची व शिळेपणाची अनेक कारणे आहेत. ती कारणे समजून घेऊन व टाळून प्रेमात दीर्घकाळ आकर्षण टिकवून ठेवता येऊ शकते.

आपल्या नजरेला दिसणाऱ्या ह्या बाह्य आकर्षणाला भाळूनच आपण प्रेमात पडतो. यात काही शारीरिक सौंदर्य, काही अदा व वागणेही असते. लग्नानंतर पती वा पत्नीत पूर्वीपासून माहित नसलेल्या एकमेकांच्या नव्या सवयी समजतात. या सवयी जोवर नव्या असतात तोवर चांगल्या वाटतात; पण कालांतराने त्या सवयी नकोशा, उबग, वैताग आणणाऱ्या वाटू लागतात व त्यामुळे दोघात ताण-तणाव वाढू लागतो. अशावेळी या सवयीमुळे आपल्या जोडीदाराला त्रास होत असेल तर एकतर त्या सोडायला हव्यात किंवा काही सवयींबाबत समजूतदारपणा दाखवायला हवा.

पती-पत्नी लग्नानंतर एकमेकांकडून काही अपेक्षा करु लागतात. त्यांना वाटते की, आपल्या जोडीदाराने आपल्या गरजा, सवयी ओळखून त्यांना साथ-समर्थन द्यावे. पती जर कामात व्यस्त असेल, तर त्याला वाटते पत्नीने आपली अडचण समजून घेऊन सहकार्य करावे, असे वाटते.

हे टाळण्यासाठी आपल्या संबंधातील ताजेपणा टिकवून ठेवण्याची गरज असते. आपल्या जोडीदाराचे विचार समजून घेऊन त्यानुसार आपल्या सवयी व्यावहारिक बनवा. खोटा स्वाभिमान टाळून वास्तवता स्वीकारुन संबंधात गोडवा भरावा. आपल्या जोडीदाराशी एकमेकांच्या आवडीनिवडीवर मनमोकळी चर्चा करा व मनमोकळे राहा.

# पती-पत्नीच्या नात्याला या सवयी घट्ट बनवितात

लग्नाची गाठ भलेही स्वर्गात बांधली जात असली तरी ती प्रत्यक्षात घट्ट करायची असेल तर नवरा बायकोला स्वत:लाच प्रयत्न करावे लागतात. नात्यावर झालेला अभ्यास आणि संशोधन सांगतं, की काही अशा सवयी आहेत ज्या नवरा बायकोच्या नात्यावर सकारात्मक परिणाम करतात. त्याचा फायदा दोघांमधलं नातं घट्ट होण्यासाठी आणि प्रेम वाढण्यासाठी होतो. ज्या तुम्हीही आजपासूनच फॉलो केल्या पाहिजेत.

आपल्या काही सवयी आपले कोणतेही नाते सुंदर बनवू शकतात. हीच गोष्ट नवरा बायकोच्या नात्याला देखील लागू होतेच. आयुष्यातल्या सर्व नात्यांमध्ये नवरा-बायकोचे एक खास नाते असते. हे नाते खूप सुंदरही असते आणि सोबत नाजूक देखील असते. त्यामुळे त्याची तितकी काळजी देखील घ्यावी लागते. अनेक कपल्सना नेहमी एक प्रश्न पडतो की आपले नाते चांगले ठेवण्यासाठी काय करता येईल?

मग ते उत्तर शोधतात आणि वेगवेगळे मार्ग वापरून आपले नाते हेल्दी बनवण्यासाठी झटतात. पण हे सगळं करण्याची गरजच पडणार नाही जर तुम्ही काही सवयी स्वत:ला लावून घेतल्या. चला या लेखात आपण अशा सवयींबद्दल जाणून घेऊ ज्या पती पत्नीच्या नात्याला घट्ट करतात.

**क्वालिटी टाईम एकत्र घालवणे** : जर नातं हेल्दी बनवायचं असेल तर एकमेकांना क्वालिटी टाइम देण्याची सवय लावली पाहिजे. वेळ घालवण्याचा अर्थ असा नाही की तुम्ही एकत्र आहात पण मोबाईलमध्ये किंवा टीव्ही पाहण्यात बिझी आहात किंवा गेम खेळताय किंवा बाजूला बसून ऑफिसचे काम करताय किंवा घरी मित्रांना बोल-ावले आहे. क्वालिटी टाईम एकत्र घालवणे म्हणजे एकमेकांना वेळ देणे. हा वेळ फक्त तुमचा असला पाहिजे.

**कम्युनिकेशन असले पाहिजे** : निरोगी आणि मजबूत नात्यासाठी संवाद खूप महत्त्वाचा आहे आणि तो असा असावा की त्यातून आपुलकीची भावना दिसून येईल. मनापासून बोलणे, एकमेकांन विश करणे, आपुलकीने विचारपूस करणे होय या गोष्टींची सवय लावून घेतली पाहिजे. जर तुमची बायको गृहिणी असेल तर तिला विचारा तिचा दिवस कसा होता. तुमच्या चांगल्या-वाईट गोष्टी आणि तुमच्या फिलिंग्स शेअर करा.. यातूनच तुमचं कम्युनिकेशन वाढत जाईल आणि नातं घट्ट होत जाईल.



**एकत्र झोपायला जा** : जर तुमची पत्नी रात्रीच्या जेवणानंतर स्वयंपाकघरातील काम पूर्ण करत असेल आणि तुम्ही बेडरूममध्ये विश्रांती घेत असाल तर तुमची ही सवय बदला. तुम्ही तिला किचनमध्ये मदत करत नसाल तरी झोपण्याऐवजी दुसरे काही काम करा आणि पत्नीचे काम संपल्यानंतर एकत्र झोपा. असे केल्याने तिलाही छान वाटेल आणि तुमच्या नात्यात फ्रेशनेस कायम राहिलं.

**सकारात्मक रहा** : सकारात्मक विचार ही केवळ एक सवय नसून ती ताकद आहे. सकारात्मक विचार करण्याची सवय असल्यास् जोडीदाराच्या वागण्यातील, सवयीतील काही खटकणाऱ्या गोष्टी असतील तरी त्या सकारात्मक पध्दतीने समजून घेण्याची ताकद त्या व्यक्तीत असते. घरातील कठीण प्रसंगात, जवळच्या व्यक्तीशी असलेल्या नाजूक संघर्षात सकारात्मकतेची ताकद ही जोडीदाराला बळ देते. समजा अशा प्रसंगांनी जोडीदार खचून जात असेल तर त्याला आपल्यात असलेली सकारात्मकता उभारी देते. सकारत्मकतेच्या सवयीमुळे एकमेकांना समजून घेण्यास मदत होते. सकारात्मक विचार करणारे नवरा बायको असतील तर कोणत्याही परिस्थितीचा विचार ते नकारात्मक पध्दतीने न करता ती परिस्थिती ते आव्हान म्हणून स्वीकारतात.

**एकमेकांच्या फिटनेसचे महत्त्व** : जोडीदार फिट असला की आपल्यालाही फिट राहाण्याची प्रेरणा मिळते. नवरा बायको एकमेकांना फिटनेस चॅलेंज देवून आपलं आरोग्य तर सुधारू शकतातच शिवाय सोबत व्यायाम केला तर एकमेकांसोबत राहाण्यासाठी वेळ मिळतो, व्यायाम करायला प्रेरणा मिळते. याबाबत झालेला अभ्यास म्हणतो, की फिटनेसचा परिणाम व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वावर होतो आणि नात्यावरही होतो.

योग, ध्यानधारणा करण्याची सवय असल्याचा त्याचा चांगला परिणाम मानसिक आरोग्यावर होतो. चिडचिडेपणा, भिती या गोष्टी कमी होतात. मनावरचा ताण निघून जातो. याचा फायदा नवरा बायकोच्या नात्यात ताण न निर्माण होण्यावर होतो. याबाबतीत तज्ज्ञ म्हणतात, की शारीरिक, मानसिक आणि भावनिकरित्या आपण कमजोर असू तर आपले आणि जोडीदाराशी असलेले संबंध देखील नकारात्मक असतात. अशा परिस्थितीत नवरा बायकोच्या नात्यात सुख, आनंद, मोकळेपणाचा अभाव असतो. चिडचिड, संशय, वाद, अशांतता आणि संकुचितता आढळते.

**स्वच्छता पाळा** : तुम्हाला देखील हे पटेल की जेव्हा तुम्ही एखाद्या घाणेरड्या ठिकाणी जाता तेव्हा तुम्हाला वाईट वाटते आणि जेव्हा तुम्ही एखाद्या सुंदर, स्वच्छ ठिकाणी जाता तेव्हा तुम्हाला आनंदी वाटते. खरं तर, एक गलिच्छ आणि अस्वच्छ रूम केवळ तणाव वाढवत नाही तर नकारात्मक ऊर्जा देखील सोडते, जी आरोग्य आणि रिलेशनशिप दोन्हीसाठी चांगली नाही. याउलट खोली स्वच्छ आणि व्यवस्थित असेल तर त्यातून सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन तुम्हाला मानसिक शांती मिळेल. साहजिकच, जेव्हा तुम्हाला उत्तम आणि चांगले वाटत असेल तेव्हा तुमच्या जोडीदारासोबतचे तुमचे नातेही सुधारेल. आपलं आरोग्य जपण्यासाठी वैयक्तिक स्वच्छतेला फार महत्त्व आहे. पण नवरा बायकोच्या नात्यातही ही वैयक्तिक स्वच्छता खूप महत्त्वाची आहे. नवरा नीट आंघोळ करत नाही किंवा बायको अस्वच्छ राहते म्हणून घटस्फोट हवा अशी प्रकरणं न्यायालयतही जातात. आपल्या भारतात अशा केसेस झाल्याची अनेक उदाहरणं आहेत. ही वैयक्तिक स्वच्छता केवळ लैंगिक आरोग्यापुरतीच महत्वाची नसून मुख दुर्गंधी, केसात कोंडा, घामाचा वास अशा अनेक गोष्टींशी निगडित असते. अशा सवयींबाबत कधीकधी जोडीदार दबावानं किंवा घाबरुन बोलत नाही. पण अशा खुपणाऱ्या स्वच्छतेशी निगडित सवयी किंवा दुर्लक्ष नवरा बायकोच्या नात्यातून हवा असणारा आनंदही देत नाही.

**एकत्र स्वयंपाक करा** : नोकरी करणाऱ्या कपल्सना दिवसा एकत्र जेवता येत नाही कारण ते आपापल्या कामात व्यस्त असतात आणि रात्रीच्या वेळीही ते थकल्यामुळे अनेकदा हॉटेलमध्ये जेवतात किंवा घरी पार्सल मागवतात. तुम्ही अशी चूक करू नका, कारण घरचे शिजवलेले अन्न तुमच्या नात्यासाठीच नाही तरआरोग्यासाठी देखील हेल्दी आहे. ऑफिसमधून आल्यावर तुम्ही दोघांनी एकत्र स्वयंपाक केला तर स्त्रीवरचा भार हलका तर होतोच पण जेवणाची चव आणि नात्याचे आरोग्यही सुधारते.

विश्वास बसत नसेल तर हे नक्की ट्राय करून पहा. पौष्टिक खाण्यामुळे निरोगी आरोग्य आणि फिटनेस मिळतो. आहारात पोषण मुल्यांचा समावेश आवर्जून करण्याची सवय असल्यास ही सवय वजन वाढू देत नाही, फिटनेस वाढवते. पोषणयुक्त आहारामुळे शरीरात 'हॅपी हार्मोन्स' निर्माण होतात. आनंदी राहाण्यासाठी पौष्टिक खाणं म्हणून महत्त्वाचं असतं. नात्यातल्या आनंदासाठी स्वत: व्यक्ती आनंदी असायला हवी. आपण आनंदी असू तर आपल्याकडे बघून, आपल्यासोबत राहून, आपल्याशी बोलून जोडीदारालाही आनंद मिळेल.

**जबाबदारी घ्या व कृतज्ञता व्यक्त करा**

कोणत्याही गोष्टीसाठी जोडीदाराला दोष न देता आपण स्वत: जबाबदारी घेणे, घरातली कामं व नातातल्या जबाबदाऱ्या पार पाडणं यामुळे जोडीदारावरील ताण हलका होतो. जोडीदार जर कोणत्या अडचणीत असेल, कामाचा जर ताण असेल तर तो समजून घ्यायला, प्रत्यक्ष मदत करून कामाचा भार हलका करायला आणि प्रत्यक्ष मदत करता येणं शक्य नसेल तर किमान मानसिक आधार देण्यास जोडीदाराच्या या मदत करण्याच्या चांगल्या सवयीचा फायदा होतो. त्यामुळे ताण तणावाच्या परिस्थितीतही नवरा बायको आपल्या मनाची , घरातली, नात्यातली शांतता एकमेकांच्या मदतीनं जपू शकतात. काही चुकलं असल्यास पटकन आपली चूक कबुल करणं, जोडीदारानं छोटी का होईना मदत केली तर त्याबद्दल आभार, कृतज्ञता (शब्दातून-कृतीतून) व्यक्त केल्यास जोडीदाराला आनंद आणि समाधान मिळतं.

■■■

# हे क्षण तुम्ही हरवले तर नाही ना ?

परिवारांसोबत सत्तीलावणी, गाण्याच्या भेंड्या, अष्टचंगपै. छोट्याश्या शेकोटीसोबत रंगलेल्या गप्पा. पारिवारिक फोटो एकत्र बसून पाहण्याचा आणि त्यावर टीकाटिप्पणी करण्याचा आनंद.

आईच्या हाताची गरमा गरम पोळी आणि त्यावर साजुक तूप.

घरचा डबा घेऊन बगीच्यात जाण्याचा आणि झाडांवर बांधलेल्या झुल्यावर झुलण्याचा आनंद.

सायंकाळची शुभंकरोती.

वयोवृद्ध वडील माणसांसोबत त्यांच्या जीवनाचे कडू गोड क्षण.

टपरीवरचा चहा.

उन्हाळ्याच्या सुटीत मामाच्या गावाला जाणे.

देशी मेवा आवळा, चिंचा, कवठ, बोर, ऊस खाण्याचा आनंद.

मित्रांसोबत पतंग उडविणे व त्याच्या काटण्याचा आनंद आणि इंदोरी भाषेत काटी हैचा आनंद.

आजच्या ह्या धावपळीच्या युगात असे किती तरी विना मूल्य तरीपण अमूल्य असलेले क्षण आज ही आठवले तरी ही ओठांवर हसू अन मनात समाधान देतात.

# ढवळगाव शिवारात गावठी कट्टा विक्रीचा प्रयत्न उधळला; दोघे जेरबंद, एक फरार

## सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या नेतृत्वाखाली बेलवंडी पोलिसांची कारवाई

जनप्रवास प्रतिनिधी :
श्रीगोंदा:

बेलवंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ढवळगाव शिवारात गावठी कट्टा विक्रीसाठी आणण्यात येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर बेलवंडी पोलिसांनी सापळा रचून दोन जणांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली असून या प्रकरणात आणखी एका संशयिताचा शोध सुरू आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवार (दि. १९ जून) रोजी बेलवंडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांना ढवळगाव शिवारातील हॉटेल रिलॅक्स परिसरात गावठी कट्टा विक्रीचा व्यवहार होणार असल्याची माहिती प्राप्त झाली होती. त्यानुसार सोनवलकर यांनी पथकासह घटनास्थळी सापळा रचला.

दरम्यान, संशयित इसम पोलिसांच्या नजरेस पडताच त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तत्परता दाखवत त्यांचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले. अंगझडतीदरम्यान सचिन विलास शिंदे (वय ३५, रा. निंबवी, ता. श्रीगोंदा) याच्या ताब्यातून एक विनापरवाना गावठी कट्टा, तर दीपक सिताराम शिंदे (रा. ढवळगाव) याच्याकडून दोन जिवंत काडतुसे आढळून आली.



चौकशीदरम्यान संबंधित शस्त्र व काडतुसे त्यांनी तुषार तांबे याच्याकडून विक्रीसाठी घेतल्याची माहिती समोर आली. त्यानुसार बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २३३/२०२६ अन्वये शस्त्र अधिनियम १९५९ च्या कलम ३, ७, २५ व २७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर करीत आहेत.

या कारवाई मध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर सह पोलीस हवालदार भाऊसाहेब यमगर, धर्मराज दहिफळे, संदीप गवारे, भाऊसाहेब शिंदे, पोलीस नाईक शरद गांगर्डे, पोलीस शिपाई कैलास शिपणकर, दादासाहेब क्षीरसागर, विकास सोनवणे, राजू भोर तसेच होमगार्ड सचिन काळाने, राहुल दिघे, राहुल धायगुडे, राहुल मासाळ, विशाल पवार आणि हनुमंत खोमणे यांनी सहभाग घेतला.

गावठी शस्त्रांची बेकायदेशीर विक्री रोखण्यासाठी बेलवंडी पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून गुन्हेगारी प्रवृत्तींवर आळा घालण्यासाठी अशा कारवाया अधिक प्रभावीपणे सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# लग्नाचे आमिष, लाखोंची उकळपट्टी अन् खंडणी; तीन महिलांच्या टोळीला राहाता पोलिसांचा दणका

जनप्रवास प्रतिनिधी :

माळवाडगांव : विवाहासाठी मुलगी दाखवून विश्वास संपादन करणे, लग्नाचे आमिष दाखवत लाखो रुपये उकळणे आणि नंतर खंडणीची मागणी करणे अशा प्रकारे तरुणांची फसवणूक करणाऱ्या तीन महिलांच्या टोळीला राहाता पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईमुळे विवाह जुळवून देण्याच्या नावाखाली सुरू असलेल्या फसवणुकीच्या प्रकारांचा पर्दाफाश झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे जिल्ह्यातील एका ३० वर्षीय तरुणाला मध्यस्थामार्फत विवाहासाठी मुलगी असल्याचे सांगण्यात आले. आरोपी महिलांनी राहाता तालुक्यातील मुलगी असल्याचे भासवून तक्रारदाराचा विश्वास संपादन केला. त्यानंतर लग्नासाठी मुलगी दाखविण्याच्या बहाण्याने तक्रारदाराकडून ऑनलाइन पद्धतीने १ लाख २८ हजार ५०० रुपये घेतले. यानंतर तक्रारदार, त्याचा भाऊ व मित्र यांना राहाता येथील सातकुरी शिवार परिसरात बोलावण्यात आले. तेथे मुलगी दाखवून लग्न

## विवाह जुळवून देण्याच्या बहाण्याने तरुणाची फसवणूक; नागरिकांनी सावध राहावे - अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांचे आवाहन

लावून देण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र काही वेळातच आरोपी महिलांनी लग्न तातडीने लावून देण्यासाठी २ लाख ३० हजार रुपयांची मागणी केली. तक्रारदाराने संशय व्यक्त केल्यानंतर त्याला व त्याच्या मित्राला एका घरात डांबून ठेवण्यात आले. तसेच बाहेर असलेल्या नातेवाईकांना फोन करून पैशांची मागणी करत धमकावण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

घटनेची माहिती मिळताच राहाता पोलिसांनी तत्परता दाखवत तक्रारदार व त्याच्या मित्राची सुटका केली. याप्रकरणी राहाता पो-लीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २४३/२०२६ दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात रेखा केशव काटे (रा. नऱ्हे, ता. आंबेगाव, जि. पुणे), मंगल अंकुश पठारे (रा. साकुरी शिवार, ता. राहाता, जि. अहिल्यानगर) आणि सुगंधा कैलास गायकवाड (रा. साकुरी शिवार, ता. राहाता, जि. अहिल्यानगर) यांना अटक करण्यात आली आहे. तपासादरम्यान आरोपी मंगल अंकुश पठारे हिच्याविरुद्ध यापूर्वीरही तत्सम स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. सध्या विवाह जुळवून देण्याच्या नावाखाली अनेक फसवणूक करणाऱ्या टोळ्या सक्रिय असून विवाहासाठी मुलगा अथवा मुलगी पाहताना संबंधित व्यक्ती, मध्यस्थ आणि कुटुंबाची संपूर्ण पडताळणी करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी खातरजमा करावी. लग्न तातडीने लावून देण्याचे आमिष, कोर्ट मॅरेजचा दबाव किंवा मोठ्या रकमेची मागणी होत असल्यास नागरिकांनी सतर्क राहावे. संशयास्पद हालचाल अथवा फसवणुकीचा प्रकार आढळल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# तीन टिप्स हातांसाठी



१- दोन मोठे चमचे पपीताच्या गरात दोन लहान चमचे मध मिसळावे. त्यात थोडी साखर घालावी. या पेस्टने हातांची मालीश करावी. त्यानंतर कोमट पाण्याचे हातांना धुऊन टाकावे. असे केल्याने हातांची त्वचा कोमल बनते.

२ - अंघोळ करण्याआधी कोमट दुधाने हातांची मालीश केली पाहिजे, त्याने हाताच्या त्वचेत निखार येतो.

३ - एक केळ मॅश करून त्यात एक लिंबाचा रस घालावा. त्या पेस्टला हातांवर लावावे. याला तुम्ही चेहऱ्यावरसुद्धा लावू शकता. दहा मिनिटाने पाण्याने धुऊन टाकावे. असे केल्याने त्वचेची चमक वाढते.

# फर्निचरशी निगडित काही वास्तू उपाय

फर्निचर भले घराचा फारच महत्त्वाचा भाग आहे, पण याचा वापर करताना वास्तूचे पालन करण्यात येत नाही.

फर्निचर

बीन विचार करून वापर करणे अर्थात वास्तू खराब करणे आहे. म्हणून घरात फर्निचर सेट करताना वास्तूच्या नियमांचे पालन अवश्य करायला पाहिजे.

तर जाणून घेऊ फर्निचरशी निगडित काही वास्तू टिप्स -

१. फर्निचर किंवा फर्निचर बनवण्यासाठी उपयोग येणारे लाकूड एखाद्या शुभ दिवशी विकत घ्यायला पाहिजे. मंगळवार, शनिवार आणि अमावास्यांच्या दिवशी फर्निचरची खरेदी करू नये.

२. लक्षात ठेवण्यासारखे की फर्निचरचे लाकूड एखाद्या पॉझिटिव्ह झाडाचे असायला पाहिजे. जसे शीशम, चंदन, अशोका, सागवान, साल, अर्जुन किंवा कडुलिंब. यांनी बनलेले फर्निचर शुभ फळ देतात.

३. हलके फर्निचर नेहमी नॉर्थ आणि ईस्ट दिशेत ठेवायला पाहिजे आणि जड फर्निचर साऊथ आणि वेस्टमध्ये ठेवायला पाहिजे. या गोष्टींकडे दुर्लक्ष केले तर तुम्हाला आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते.

४. घरात वुडवर्कचे काम नेहमी साऊथ किंवा वेस्ट डायरेक्शनमध्ये सुरू करायला पाहिजे आणि नार्थ ईस्टमध्ये संपवायला पाहिजे. असे केल्याने घरातील लोकांची प्रगती चांगली होते.



५. फर्निचर बनवताना खरेदी केलेले लाकडाला नॉर्थ, ईस्ट किंवा नॉर्थ-ईस्ट डायरेक्शनमध्ये नाही ठेवायला पाहिजे. असे केल्याने फर्निचर बनण्याच्या प्रोसेसमध्ये उशीर होऊ शकतो आणि पैसांचा प्रवाह देखील थांबतो.

६. तुम्ही फर्निचरमध्ये राधा-कृष्ण, फूल, सूर्य, वाग, चीता, मोर, घोडा, बैल, गाय, हत्ती आणि मासोळीची आकृती बनवू शकता. फर्निचरवर नेहमी हलक्या

पॉलिशचा वापर करा. डार्क आणि डल रंग नकारात्मकता पसरवतात.

७. फर्निचरचे कोपरे गोलाकार असायला पाहिजे. टोकदार कोपरे फक्त खतरनाकच नसतात बलकी हे खराब ॲनर्जी देखील सोडतात. जर तुमचे फर्निचर छताला लागत असेल तर फर्निचरची उंची कमी करवून घ्या.

८. जर बेडच्या हेडबोर्डचे डायरेक्शन साऊथ किंवा वेस्टमध्ये असेल तर, तुम्हाला हेडबोर्डच्या समोरच्या भिंतीला डेकोरेट करायला पाहिजे. यामुळे बेडवर झोपणाऱ्यांचे आरोग्य उत्तम राहते.

९. ऑफिससाठी स्टील फर्निचरचा देखील प्रयोग करू शकता. ऑफिसमध्ये याचा वापर केल्याने पॉझिटिव्ह ॲनर्जी आणि पैसांचा फ्लो बनून राहतो.

१०. गरज असल्यास जास्त कॉर्नर्स असणाऱ्या फर्निचराला शुभ नाही मानले जात. म्हणून प्रयत्न करावा की घरात कमीत कमी फर्निचर बनवायला पाहिजे.

जाहिर नोटीस
दौंड येथील मे. उपविभागीय अधिकारी, दौंड यांचे कोर्टात
पिठासन अधिकारी श्री रेवणनाथ लबडे सो.

दि. १२/०६/२०२६

श्री.दिनेश मोहन खुडे- अर्जदार
रा. लोकमान्य कॉलनी,परमहंस नगर
कोथरुड,पुणे,जि.पुणे

वि.
मुख्यधिकारी सो.- जाबदेणार
दौंड नगरपरीषद दौंड
दौंड ता. दौंड,जि.पुणे

या जाहीर नोटीशीव्दारे तमाम लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार श्री.दिनेश मोहन खुडे यांची मुलगी कु.राजकन्या दिनेश खुडे हिचा जन्म उपजिल्हा रुगणालय दौंड,ता.दौंड, जि. पुणे येथे दि. १७/०३/२०२३ रोजी झालेला आहे. तिच्या जन्माची नोंद लिंगाळी ग्रामपंचायत दौंड,ता.दौंड दप्तरी नसल्याने सदर जन्म नोंद होणेबाबत परवानगी मिळणेकामी व तसा जन्म दाखला मिळणेबाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज मे. प्रांत कार्यालय दौंड येथे दाखल केलेला आहे.तसेच अर्जदार यांचा सदर दाखला मिळणेचा आदेश होणेबाबत मागणी केलेली आहे.

तरी या जाहिर नोटीशी व्दारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, ज्या कोणास सदर अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील १५ दिवसांत जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून स्वतः अगर वकिलां मार्फत लेखी हरकत उपविभागीय अधिकारी, दौंड यांचेकडे किंवा मा. मंडळ अधिकारी सो.यांच्या कडे हरकत न आल्यास तर अर्जदार श्री.दिनेश मोहन खुडे यांची मुलगी कु.राजकन्या दिनेश खुडे हिचा जन्माचा दाखला देण्याचा आदेश देण्यात येईल यांची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस असे.

उपविभागीय दंडाधिकारी दौंड
उपविभाग दौंड

# गरोदरपणात रस्त्यातील खड्डे टाळा, नाहीतर सुरू होतील लेबर पेन

हल्ली रस्त्यांनी प्रवास करणे हे सामान्यांना पण त्रासदायक असतं. अशावेळी गर्भवती स्त्रीला त्रास किती होत असेल याची कल्पना न करणेच बरं आहे. खड्डेमय रस्त्यावरून गाडी चालवतानाही खूप हादरे बसतात. असे हादरे गरोदरपणात योग्य मानले जात नाहीत. गरोदरपणात वाहन चालवणे किंवा खडबडीत रस्त्यावर प्रवास करणे योग्य आहे की नाही हे जाणून घ्या. डॉक्टरांनी स्वतः दिली चेतावणी.

भारतातील रस्त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. नवीन रस्ते बनवल्यानंतर काही महिन्यांनी खड्डे दिसू लागतात आणि प्रवास बिकट होऊ लागतो. प्रवास करताना खड्डे आणि वारंवार होणाऱ्या धक्क्यांमुळे प्रचंड त्रास होत असून प्रवासही विस्कळीत झाला आहे. अशा रस्त्यावर गरोदरपणात प्रवास करणे खूपच अस्वस्थ होऊ शकते.रस्त्यावर वारंवार अडथळे आल्याने ओटीपोटात आकुंचन देखील होऊ शकते आणि बऱ्याच स्त्रियांना भीती वाटते की यामुळे प्रसूती वेदना देखील होऊ शकतात. जर तुम्हालाही वाटत असेल की खड्ड्यातील रस्त्यावर प्रवास केल्याने प्रसूती वेदना होतात. तर हे खरे आहे की नाही हे येथे तुम्हाला कळू शकते.

**खरंच लेबर पेन होताता का** : मदर्स लॅप आयव्हीएफ सेंटरच्या वैद्यकीय संचालक आणि आयव्हीएफ तज्ज्ञ शोभा गुप्ता सांगतात की, गरोदरपणाच्या आठव्या किंवा नवव्या महिन्यातही खडबडीत रस्त्यावरून प्रवास केल्याने प्रसूती वेदना होत नाहीत. अशा रस्त्यांवर सावकाश गाडी चालवावी कारण त्यामुळे शरीराला धक्का बसण्याचा धोका कमी होतो. डॉ शोभा सांगतात की, वारंवार धक्के दिल्याने गर्भातील बाळ घाबरू शकते, त्यामुळे अशा ठिकाणी जाणे टाळणे चांगले.

**हे करताना सांभाळा** : जर तुमची डिलिव्हरीची तारीख निघून गेली असेल आणि तुमची डिलिव्हरी कधीही होऊ शकते. अशावेळी बम्पी रोडवर प्रवास करणे योग्य ठरणार नाही. अशा रस्त्यांवर वेगाने चालणाऱ्या वाहनांमुळे धक्के आणि जखमा होऊ शकतात. जे गर्भधारणेदरम्यान आई आणि बाळासाठी अजिबात सुरक्षित नाहीत.

**यावेळी करू नये प्रवास** : अशी काही परिस्थिती असू शकते ज्यामध्ये डॉक्टर गर्भवती महिलेला बम्पी रोडवर प्रवास न करण्याचा सल्ला देऊ शकतात. खड्डे असलेल्या ठिकाणी प्रवास करताना कोणत्या परिस्थिती टाळल्या पाहिजेत याबद्दल अधिक जाणून घ्या.

**या महिलांनी स्वत:ची घ्यावी जास्त काळजी** : जर तुम्हाला प्लेसेंटा प्रिव्हिया, कमकुवत गर्भाशय ग्रीवा, गर्भाशयाच्या ग्रीवेचा सर्कलेज असेल किंवा मुदतपूर्व प्रसूतीचा धोका असेल. तर तुम्ही खडबडीत रस्त्यावर प्रवास करणे टाळावे. गरोदरपणात बसमधून प्रवास करायचा की नाही यासंदर्भातही डॉक्टरांचा सल्ला आवश्यक आहे. बस किंवा तीनचाकी यांसारखी काही वाहने कारसारखी सुरक्षित नसतात आणि त्यांना धक्का बसण्याची शक्यता असते. त्याचबरोबर गरोदरपणात खडबडीत रस्त्यावर स्कूटी चालवू नये.

**यांना देखील घ्यावी लागेल विशेष काळजी** : डॉक्टरांनी तुम्हाला बेड रेस्टचा सल्ला दिला असेल किंवा तुम्हाला मणक्याचा त्रास असेल तर तुम्ही विशेष काळजी घ्यायला हवी. कोणत्याही वैद्यकीय कारणामुळे प्रसूतीचा सल्ला दिला असेल तरीही तुम्ही बम्पी रोडवरून प्रवास करणे टाळावे. तसेच गर्भवती महिलांनी खड्यांनी भरलेल्या रस्त्यावरून प्रवास करणे टाळाच.

**प्रवास करायचा असेल तर** : जर तुम्ही प्रवास करत असाल आणि त्या प्रवासात रस्त्यात खड्डे असतील तर प्रवास करणे टाळा. अडथळे किंवा खड्डे पूर्णपणे टाळू शकत नसाल तर अतिशय हळू गाडी चालवण्याचा सल्ला द्या.

**जाहीर नोटीस**
इंदापूर येथील मे.५ वे सह दिवाणी न्यायाधीश,'क' स्तर यांचे कोर्टात
(मे.एस.बी.लेंडवे सो.,कोर्ट)

दि.१६/०६/२०२६
दिवाणी किरकोळ अर्ज क.४२/२०२६
नि.६
म.जा.क.८८१/२०२६

श्री.सचिन विजय भालेराव अर्जदार
रा.सावतामाळीनगर,नागझरीमळा,इंदापूर
ता.इंदापूर,जि.पुणे
विरुध्द
कोणी नाही जाबदेणार

जाहीर नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी मे.एस.बी. लेंडवे सो, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,इंदापूर, जि.पुणे या कोर्टाकडे मयत कै.मंगल विजय भालेराव यांचा मृत्यु दि. २६/०२/२०२४ रोजी झालेला आहे. अर्जदार यांनी त्यांचे मुलगा या नात्याने त्यांनी भारतीय वारसा कायदा चे कलम ३७२ प्रमाणे मयत मंगल विजय भालेराव यांची बारामती सहकारी बँक लि., शाखा इंदापूर येथील रूपये ४,८७,३१३/- या रकमेस कायदेशीर वारस आहेत असे प्रमाणपत्र मिळण्यासंबंधीचा अर्ज केलेला आहे.

ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी दि.१६/०७/२०२६ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता स्वतः किंवा वकीलामार्फत या कोर्टात हजर रहावे.

आज दिनांक १६/०६/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

ठिकाण : इंदापूर
दिनांक : १६/०६/२०२६

शिक्का

आदेशावरून
सही/-
सहा. अधीक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय
इंदापूर.

# भविष्यातील संरक्षण सज्जतेसाठी देशाची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल : राजनाथ सिंह

जनप्रवास : प्रतिनिधी

नागपूर : देशाला भविष्यात संरक्षणसज्ज ठेवायचे असेल तर संरक्षण क्षेत्राशी संबंधित अत्यावश्यक गरजांवर स्वत:चे नियंत्रण असणे अत्यंत गरजेचे आहे. त्या दृष्टीने यंत्र इंडियाचा अत्याधुनिक ॲल्युमिनिअम एक्सट्रूजन प्रेस प्रकल्प भारताचे आयात अवलंबित्व कमी करून देशाला आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने अत्यंत महत्त्वाचा ठरेल. या प्रकल्पाच्या माध्यमातून संरक्षण, एरोस्पेस, विमाननिर्मिती, क्षेपणास्त्र कार्यक्रम, रेल्वे आणि इतर धोरणात्मक क्षेत्रांसाठी आवश्यक असलेल्या उच्च दर्जाच्या ॲल्युमिनियम मिश्रधातूंच्या निर्मितीला मोठी चालना मिळेल आणि देशाच्या संरक्षण क्षमतेत मोठी भर पडेल, असा विश्वास संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी



व्यक्त केला.

यंत्र इंडिया लिमिटेडच्या अंबाझरी आयुध निर्माणीतील १० हजार टन क्षमतेच्या अत्याधुनिक ॲल्युमिनियम एक्स्ट्रूजन प्रेस प्रकल्पाच्या भूमिपूजन कार्यक्रमात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह बोलत होते. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी संरक्षण उत्पादन विभागाचे सचिव संजीव कुमार, संयुक्त सचिव गरिमा भगत, यंत्र इंडिया लिमिटेडचे सीएमडी विजय कुमार अय्यर यांच्यासह संरक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह म्हणाले, हा प्रकल्प म्हणजे आयातीवर अवलंबून राहण्याऐवजी देशांतर्गत उत्पादनक्षमतेला चालना देणारा महत्त्वाचा टप्पा आहे. संरक्षण प्रणाली, क्षेपणास्त्र कार्यक्रम, अंतराळ संशोधन, विमान उद्योग, रेल्वे आणि इतर धोरणात्मक क्षेत्रांसाठी आवश्यक असलेले मोठ्या आकाराचे व गुंतागुंतीचे ॲल्युमिनियम मिश्रधातू घटक या प्रकल्पातून तयार करता येणार आहेत. त्यामुळे महत्त्वाच्या अशा ॲल्युमिनियम घटकांच्या आयातीवरील अवलंबित्व कमी होऊन देशांतर्गत पुरवठा साखळी अधिक मजबूत होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

आधुनिक लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे आणि अंतराळ कार्यक्रमांसाठी हलके, मजबूत आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थिती सहन करू शकणारे धातू आवश्यक असतात. अशा धातूंची निर्मिती विशेष प्रक्रियेद्वारे केली जाते. त्यामुळे हा प्रकल्प संरक्षण उत्पादन क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे नमूद करून संरक्षणमंत्री राजनाथसिंह म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरच्या यशात देशात विकसित झालेल्या संरक्षण उपकरणांची अत्यंत महत्वपूर्ण भूमिका राहिली आहे. मोठ्या यंत्रणांची खरी ताकद हजारो लहान-मोठ्या घटकांमध्ये दडलेली असते. ॲल्युमिनियम एक्स्ट्रूजन प्रेसमुळे या क्षेत्रात आत्मनिर्भरतेकडे वाटचाल अधिक वेगाने होईल, असे ते म्हणाले.

संरक्षण उत्पादन क्षेत्रातील देशाच्या प्रगतीचा आढावा घेताना राजनाथ सिंह यांनी सांगितले की, २०१४ मध्ये देशांतर्गत संरक्षण उत्पादन सुमारे ४६ हजार कोटी रुपये होते. २०२५-२६ या आर्थिक वर्षात विक्रमी १.७८ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. संरक्षण क्षेत्रातील निर्यातही २०१४ मधील एक हजार कोटींवरून वाढून ३८ हजार ४२४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. पुढील दोन ते तीन वर्षांसाठी निश्चित केलेले तीन लाख कोटी रुपयांचे संरक्षण उत्पादन आणि ५० हजार कोटी रुपयांच्या संरक्षण निर्यातीचे उद्दिष्ट नियोजित वेळेपूर्वीच साध्य होईल, असा विश्वास संरक्षणमंत्र्यांनी व्यक्त केला.

## विधानमंडळ पावसाळी अधिवेशनासाठी छापील पास बंद; सर्वांना 'चेहरा पडताळणी पध्दती'द्वारेच प्रवेश

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन सोमवार, २२ जून, २०२६ पासून विधान भवन, मुंबई येथे सुरू होणार असून यावेळी विधान भवन प्रवेशासाठी प्रथमच एकही प्रवेश पत्रिका छापण्यात येणार नसून पीठासीन अधिकारी, मुख्यमंत्री ते अधिकारी-कर्मचारी वर्ग, स्वीय सहायक, अभ्यागत अशा सर्वांसाठी विधान भवन ई-प्रवेश प्रणालीद्वारे 'चेहरा पडताळणी पध्दती' अवलंबिण्यात येत आहे, अशी माहिती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातर्फे देण्यात आली. विधानपरिषदेचे माननीय सभापती प्रा.राम शिंदे आणि विधानसभेचे माननीय अध्यक्ष ड. श्री.राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून त्याची अत्यंत काटेकोर स्वरूपात अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

अधिवेशनकाळात विधान भवन परिसरामध्ये होणारी गर्दी नियंत्रित असावी तसेच सुरक्षा यंत्रणेला तपासणी संदर्भात सुलभता असावी या दृष्टीने या पावसाळी अधिवेशनात छापील प्रवेशपत्राऐवजी 'चेहरा पडताळणी पध्दती' राबविण्यात येत असून याबाबत मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री तसेच अन्य सर्व संबंधित आस्थापना, वार्ताकनासाठी येणारे इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट माध्यमांचे प्रतिनिधी, भा.प्र.से. तसेच भा.पो.से. आणि अन्य सर्व अधिकारी कर्मचारी, सचिव-विशेष कार्य अधिकारी, सर्व स्वीय सहायक अशा सर्वांना यासंदर्भात विधानमंडळ सचिवालयातर्फे सूचित करण्यात आले आहे. ई-ऑफिस प्रणालीद्वारे ऑनलाईन स्वरूपात माहिती पाठविणे, आवश्यक ती माहिती ई-मेलवर प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरू झाली असून ती दिनांक २० व २१ जून, २०२६ रोजी सुटीच्या दिवशीही सुरू राहणार आहे. यासंदर्भातील सविस्तर परिपत्रक महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने जारी केले आहे. सर्वांनी या नव्या प्रवेशपास प्रणालीचा स्वीकार करावा आणि सुरक्षा यंत्रणेला सहकार्य करावे असे आवाहनही विधानमंडळ सचिवालयातर्फे करण्यात आले आहे.

## शालेय शिक्षण विभाग आणि गुगल दरम्यान कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षणासाठी करार

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाचे प्रगत प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शालेय शिक्षण विभाग आणि गुगल फॉर एज्युकेशन यांच्यादरम्यान उद्देशपत्रावर स्वाक्षरी करण्यात आली. या उपक्रमाअंतर्गत पुढील दीड वर्षांच्या कालावधीत राज्यातील चार लाखांहून अधिक शिक्षकांना 'गुगल एआय एज्युकेटर सिरीज' अंतर्गत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात गुगल फॉर एज्युकेशन विभागाचे उपाध्यक्ष ख्रिस फिलिप्स, तर शालेय शिक्षण विभागाच्या वतीने सहसचिव ताशीलदार यांनी उद्देशपत्रावर स्वाक्षरी केली.

यावेळी बोलताना शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांना आधुनिक कौशल्यांनी सुसज्ज करणे ही काळाची गरज आहे. या कराराअंतर्गत टप्प्याटप्प्याने शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येणार असून प्रारंभी निवडक मास्टर ट्रेनर्सना प्रशिक्षण दिले जाईल. त्यानंतर हे प्रशिक्षित शिक्षक राज्यभरातील इतर शिक्षकांना प्रशिक्षण देतील. या माध्यमातून राज्यातील प्रत्येक शाळेपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेवरील प्रशिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या उपक्रमासाठी राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नसून संपूर्ण प्रशिक्षण गुगलमार्फत विनामूल्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. शिक्षकांच्या डिजिटल सुरक्षिततेची काळजी घेण्यात आली असून या संपूर्ण प्रक्रियेवर महाराष्ट्र शासनाचे नियंत्रण राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## पालखी सोहळा सर्वोत्कृष्ट होण्यासाठी समन्वयाने काम करा : मंत्री जयकुमार गोरे

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : आगामी आषाढी वारीमध्ये पालखीतील एकाही वारकऱ्याला असुविधा होता कामा नये, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश आहेत; त्यानुसार सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून पालखी सोहळा सर्वोत्कृष्ट पद्धतीने कसा होईल या दृष्टीने प्रयत्न करावे, असे आवाहन ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

आषाढीवारी निमित्त विधानभवन येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, विभागीय आयुक्त शितल तेली- उगले, पुणे



जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सोलापूर जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पुणे शहर विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. प्रशांत अमृतकर, अपर आयुक्त, सामान्य प्रशासन तुषार ठोंबरे आदी उपस्थित होते.

आषाढीवारीदरम्यान पाणी, शौचालये, स्वच्छता, आरोग्य सुविधा, मुक्कामाची चांगली व्यवस्था आदींची चोख व्यवस्था ठेवावी असे सांगून मंत्री गोरे म्हणाले, ग्रामविकास विभागाने पालखी सोहळ्यासाठी पहिल्यांदाच गतवर्षीपासून निधीची तरतूद ठेवण्यास सुरूवात केली. यावर्षी पालखीसाठी ७६ कोटी रुपयांना मान्यता देण्यात आली आहे. यामुळे आवश्यकतेप्रमाणे सोयी सुविधा निर्माण करण्यात येत असून त्या दर्जेदार होतील याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे, असेही ते म्हणाले.

श्री. गोरे पुढे म्हणाले, पालखी सोहळ्यासाठी मुक्कामाच्या ठिकाणी शौचालयांचा वापर होईल अशा ठिकाणी शौचालये ठेवावीत. तेथे पाण्याची उपलब्धता व सतत स्वच्छता होईल यासह शौचालयांच्या मार्गावर चिखल होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यासाठी त्या ठिकाणी कॉंक्रेटीकरण करण्याची कार्यवाही करावी. यावर्षी शौचालयांचे अतिरिक्त संच ठेवण्यात आल्याने किमान ३६ ते ४८ तास अगोदर ते पालखीच्या पुढील मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचेल याची काळजी घ्यावी. पालखीच्या मुक्कामाच्या ठिकाणी जर्मन हँगर, जलरोधक मंडप आदी व्यवस्था करण्यात आली आहे. असून वारकऱ्यांची निवाऱ्याची व्यवस्था चांगल्या प्रकारे होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


पालखीमार्गाला जोडणारे ग्रामीण भागातील रस्ते, मार्गापासून पालखीतळाकडे जाणारे रस्त्यांची तात्पुरती दुरूस्ती न करता कायमस्वरुपी टिकतील असे सिमेंटचे रस्ते करावेत. वारंवार रस्त्यांची दुरुस्ती करावी लागू नये यासाठी सिमेंट रस्ते करण्याबाबत प्रस्ताव पाठवावेत जेणेकरुन पुढील वर्षीच्या पालखीपूर्वी असे रस्ते तयार होतील, आदी सूचनाही श्री. गोरे यांनी यावेळी दिल्या.

## राज्यातील जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापनाचा अहवाल सहा महिन्यांत सादर करा : मंत्री पंकजा मुंडे

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील विविध रुग्णालयांतून निर्माण होणाऱ्या जैववैद्यकीय कचऱ्याचे प्रमाण, त्यावरील प्रक्रिया, वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांची क्षमता, प्रत्यक्ष कामकाज आणि संबंधित भागातील गरज यांचा सखोल अभ्यास करून सहा महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांच्या कामकाजावर नियमित नियंत्रण ठेवण्याबरोबरच विद्यमान धोरणात आवश्यक बदल करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांबाबतची सद्यस्थिती व अधिकार क्षेत्राच्या पुनर्रचनेसंदर्भात पंकजा मुंडे यांनी



आज मंत्रालयीन दालनात बैठक घेतली. यावेळी विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार, उपसचिव जॉय ठाकूर आदी उपस्थित होते.

राज्यातील वैद्यकीय कचरा (बायो-मेडिकल वेस्ट) व्यवस्थापनाची सध्याची स्थिती, उपचार केंद्रांची क्षमता, परवानगी प्रक्रिया आणि देखरेख याबाबत यावेळी आढावा घेण्यात आला.

केंद्र शासनाच्या नियमानुसार जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया केंद्रांना परवाने देताना रुग्णालयांना पर्याय उपलब्ध व्हावेत, स्पर्धात्मक व्यवस्था निर्माण व्हावी आणि सेवा अधिक कार्यक्षम व्हावी. एखाद्या संस्थेवर संपूर्ण अवलंबून राहण्याऐवजी विविध भागांमध्ये पुरेशी प्रक्रिया केंद्रे उपलब्ध असावीत, असे मत मंत्री मंत्री मुंडे यांनी व्यक्त केले. वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांची क्षमता, प्रत्यक्षात होणारे काम आणि संबंधित भागातील गरज यांचा नियमित आढावा विभागाच्या सचिवांनी घ्यावा, असे निर्देश देण्यात आले. केंद्रांच्या कामकाजावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रभावी देखरेख ठेवावी, तसेच कचऱ्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने होत आहे की नाही याची तपासणी करावी, असेही मंत्री मुंडे यांनी यावेळी सांगितले.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करून त्यानुसार राज्याचे धोरण अद्ययावत करण्यात यावे. नवीन परवाने देताना 'गॅप ॲनालिसिस'चा विचार करावा आणि संबंधित भागातील प्रत्यक्ष गरज लक्षात घ्यावी, असेही निर्देशही मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले.

वैद्यकीय कचऱ्याच्या अयोग्य विल्हेवाटीमुळे पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे नियमांचे काटेकोर पालन, वेळेवर तपासणी आणि जबाबदारी निश्चित करण्यावर भर देण्यात यावे. तसेच निर्देशांची तातडीने अंमलबजावणी करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचनाही मंत्री मुंडे यांनी यावेळी दिल्या.

## जावजीबुवाचीवाडी येथे पीएम किसान योजनेच्या २३ व्या हप्त्याचे थेट प्रक्षेपण

जनप्रवास : प्रतिनिधी

यवत : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पश्चिम बंगाल येथून 'पीएम किसान सन्मान निधी' योजनेच्या २३ व्या हप्त्याचे वितरण सोहळा नुकताच पार पडला. या राष्ट्रीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दौंड तालुक्यातील जावजीबुवाचीवाडी येथे आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाला परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

जावजीबुवाचीवाडी येथे आयोजित या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी देशपातळीवर केलेल्या मार्गदर्शनाचे थेट प्रक्षेपण सर्वांनी अनुभवले. यानंतर स्थानिक स्तरावर आयोजित मार्गदर्शन शिबिरात सहायक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. पीएम



किसान योजनेचे लाभ अखंडितपणे मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपली माहिती अद्ययावत ठेवणे किती महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी भर दिला.

यावेळी बोलताना सहायक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी स्पष्ट केले की, पीएम किसान योजनेच्या पुढील लाभांसाठी आता 'फार्मर आयडी' (ऋीशी खऊ) अत्यंत गरजेचा आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही तांत्रिक अडचणींशिवाय योजनेचा लाभ घेण्यासाठी लवकरात लवकर आपला फार्मर आयडी तयार करून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी अनेक शेतकऱ्यांनी त्यांना योजनेबाबत येणाऱ्या समस्या मांडल्या, ज्यांचे निरसन जगताप यांनी यावेळी केले.

कार्यक्रमास आशिष अनपट, आबासाहेब राजवडे, रघुनाथ आखाडे, विनोद राजवडे, ऋषिकेश राजवडे, विनायक सणस, आबा सोनवणे, दाजी चौधरी यांच्यासह इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कला विश्व

### ती कोणालाच ओळख दाखवत नाही, प्राजक्ता कुलकर्णींनी उर्मिला मातोंडकरबद्दल व्यक्त केली खंत

एन. चंद्रा दिग्दर्शित 'नरसिम्हा' सिनेमा १९९१ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला. यामध्ये लोकप्रिय अभिनेत्री उर्मिला मातोंडकरने मीनू ही भूमिका साकारली होती. ही भूमिका आधी वेगळ्या दोन अभिनेत्रींना ऑफर करण्यात आली होती. यामध्ये एका लोकप्रिय मराठी अभिनेत्रीचा सुद्धा समावेश आहे. या अभिनेत्रीचं नाव आहे प्राजक्ता कुलकर्णी. सध्या प्राजक्ता 'ठरलं तर मग' या टीआरपी टॉपर मालिकेत सायलीच्या सासूबाईंची भूमिका साकारत आहेत. पण, यापूर्वी त्यांनी अनेक हिंदीसह मराठी चित्रपट, 'चार दिवस सासूचे' सारख्या गाजलेल्या मालिकांमध्ये काम केलेलं आहे. 'नरसिम्हा'



चित्रपटाची ऑफर आली तेव्हा, प्राजक्ता 'धडाकेबाज' सिनेमाच्या शूटिंगमध्ये व्यग्र होत्या. तारखा जुळत नसल्याने त्यांच्याकडे नकार देण्याशिवाय पर्याय नव्हता. यानंतर ही भूमिका उर्मिला मातोंडकरने साकारली. पण, तिने मुलाखतीत राजेश्वरीचं ( जिला सर्वात आधी 'नरसिम्हा'चा रोल ऑफर झाला ) नाव घेतलं पण, माझ्या नावाचा उल्लेख कुठेही केला नाही अशी खंत प्राजक्ता यांनी 'अभिजात मराठी फिल्मी'ला दिलेल्या मुलाखतीत बोलून दाखवली. प्राजक्ता दिघे-कुलकर्णी म्हणाल्या, नरसिम्हा' सिनेमाबद्दल मला जेव्हा विचारण्यात आलं, तेव्हाच मी 'धडाकेबाज' चित्रपटाचं शूटिंग करत होते. त्यावेळी आमचं 'धडाकेबाज'चं तिसरं शेड्युल सुरू होतं. 'नरसिम्हा'साठी मला एन. चंद्रा यांचा फोन आला होतात्यांनी मला चित्रपटाबद्दल वगैरे माहिती दिली. आधी त्यांनी एका हिरोईनला विचारलं होतंपण ऐनवेळी तिला काहीतरी अडचण आली मग त्यांनी मला फोन केला. कारण, सेट वगैरे सगळं तयार होतं. त्यांना मग मी 'धडाकेबाज'बद्दल सर्व सांगितलं. आमच्या तारखा जुळल्या नाहीत. मग शेवटी 'नरसिम्हा' चित्रपटातली भूमिका उर्मिला मातोंडकरने केली. उर्मिला मातोंडकरचा त्या सिनेमानंतर एका मॅगझिनमध्ये इंटरव्ह्यू आला होता. त्यात तिने म्हटलं होतं की, 'नरसिम्हा'ची भूमिका आधी राजेश्वरीला ऑफर झाली होती. पण, तिचा पाय फ्रॅक्चर झाला होता. त्यामुळे तिला शूटिंग जमलं नाही. त्या इंटरव्ह्यूमध्ये उर्मिलाने पुढे असंही लिहिलं होतं की, राजेश्वरीनंतर आणखी एका अभिनेत्रीला या रोलसाठी विचारणा झाली होती. पण ते सुद्धा जुळलं नाहीतिने कुठेही माझं नाव घेतलं नाही. खरंतर, ती मला आधीपासून ओळखत होती. पण, तिने माझं घेतलं नाही. मराठी अभिनेत्रीच ओळख दाखवत नाहीतयातलीच ती एक आहे. माझ्या बाबांनी उर्मिलाचा तो मॅगझिनचा इंटरव्ह्यू वाचला आणि तिच्या त्या ओळी अंडरलाइन

### तुम्ही तिला स्पर्श कसा केला?, ऐश्वर्या रायचा हात धरल्यामुळे संजय लीला भन्साळींवर भडकलेला सलमान

'हम दिल दे चुके सनम' या लोकप्रिय चित्रपटाला प्रदर्शित होऊन २७ वर्षे पूर्ण झाली आहेत. हा चित्रपट केवळ त्याच्या कथानक, संगीत आणि अभिनयासाठीच नव्हे, तर सलमान खान आणि ऐश्वर्या राय यांच्या कथित प्रेमसंबंधांमुळेही चर्चेत राहिला होता. असं म्हटलं जातं की, याच चित्रपटाच्या सेटवर दोघांमधील जवळीक वाढली होती. या चित्रपटातील अभिनेत्री स्मीता जयकर यांनी एका मुलाखतीत सांगितल्यानुसार, सलमान खान ऐश्वर्या रायवर खूप प्रेम करत होता. शूटिंगदरम्यान एका सीनदरम्यान दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांनी ऐश्वर्याचा हात धरून तिला सीन समजावून सांगण्याचा प्रयत्न केला होता. हे पाहिल्यानंतर सलमान खान भन्साळींवर नाराज झाला होता, असं स्मिता जयकर यांनी सांगितलं. 'हम दिल दे चुके सनम' हा चित्रपट १८ जून १९९९ रोजी प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात सलमान खान, ऐश्वर्या राय आणि अजय देवगण यांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. सजंय लीला भन्साळी यांच्या लोकप्रिय ठरलेल्या चित्रपटांपैकी हा एक आहे. या चित्रपटात स्मीता जयकर, विनय पाठक, राजीव वर्मा,राजीव गोखले आणि दिव्या जगदाळे यांसारख्या कलाकारांनीही महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या होत्या. चित्रपटाची कथा, संगीत आणि कलाकारांच्या अभिनयामुळे तो आजही प्रेक्षकांच्या आवडत्या चित्रपटांपैकी एक मानला जातो. सलमान खान ऐश्वर्या रायबाबत खूपच पझेसिव्ह होता असं म्हटलं



जातं. अभिनेत्री स्मीता जयकर यांनी यासंदर्भातील एक किस्सा दिलेल्या मुलाखतीत सांगितला होता. 'हम दिल दे चुके सनम' चित्रपटात त्यांनी ऐश्वर्याच्या आईची भूमिका साकारली होती. या मुलाखतीत स्मिता जयकर यांनी चित्रपटातील लोकप्रिय 'आँखो की गुस्ताखियां' या गाण्याच्या चित्रीकरणावेळी घडलेला प्रसंग सांगितला. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्या काळात सलमान खान ऐश्वर्या रायबाबत खूप पझेसिव्ह होता. याच गाण्याच्या शूटिंगदरम्यान घडलेल्या एका प्रसंगामुळे सेटवर काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झालं होतं. या प्रसंगाबद्दल सांगताना स्मिता जयकर म्हणाल्या, मला आठवतं, आंखों की गुस्ताखियां गाण्याच्या एका दृश्यात ऐश्वर्या रायला एका जागी उभं राहायचं होतं आणि सलमान खानला तिच्या भोवती फिरायचं होतं. सीन समजावून सांगण्यासाठी संजय लीला भन्साळी ऐश्वर्याजवळ गेले आणि बोलताना त्यांनी तिला सहज स्पर्श केला. ते पाहून सलमान खान म्हणाला, संजय सर, तुम्ही तिला स्पर्श कसा केला? तुम्ही तिला स्पर्श करू शकत नाही. स्मिता जयकर यांच्या मते, हा संवाद तेवढ्यापुरताच मर्यादित राहिला आणि त्यानंतर कोणताही वाद झाला नाही. पुढे शूटिंग सुरळीतपणे पार पडले आणि सेटवरील वातावरणही पूर्वीसारखं झालं होतं.

* मुख्य संपादक - संजय प्रल्हाद भोकरे * संपादक -सिद्धार्थ संजय भोकरे * सरव्यवस्थापक - सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन - ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com